किंमत - वार्षिक वर्गणी १००/- रुपये

# अर्थबोधपत्रिका

आपल्या आजूबाजूस घडणाऱ्या विविध घटनांचा
'अर्थ'बोध करून देणारे मासिक

INDIAN SCHOOL OF POLITICAL ECONOMY
7/9/07
LIBRARY

● 'शहरी' विश्व विशेषांक ●

३ ● युगांतर
५ ● 'शहरी' विश्वाचा नकाशा
१५ ● कशी निर्माण होतात शहरे ?
१९ ● चला शहरांकडे ....!
२९ ● शहरांचा विस्तार आणि आकार

● 'शहरी' विश्व विशेषांक ●

खंड ६ : अंक ६ सप्टेंबर २००७

भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी

<u>वार्षिक वर्गणी १००/- रुपये</u>

**(परदेशस्थ वाचकांसाठी $२०)**

वर्गणी डिमांड ड्राफ्ट/ मनीऑर्डर/ पोस्टल ऑर्डर/चेकने किंवा रोख **'इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी'** या नावे पाठवावी. त्याबरोबर **नाव व संपूर्ण पत्ता पिनकोडसह कळवावा.**

**<u>'अर्थबोधपत्रिका' दर महिन्याच्या १० तारखेला पोस्टाने पाठविली जाते.</u>**

**<u>वर्गणीसाठी पत्ता</u> :**

**व्यवस्थापक, अर्थबोधपत्रिका,**

**भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी,** अर्थबोध, ९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग, (रत्ना हॉस्पिटलजवळ) पुणे ४११ ०१६.

फोन : २५६५७१३२, २५६५७२१०

फॅक्स : २५६५७६९७

ई-मेल: ispe@vsnl.net, ispe@vsnl.com

**अर्थबोधपत्रिका**

**खंड ६ (अंक ६) सप्टेंबर २००७**

**संपादक - अभय टिळक**

**साहाय्यक संपादक - राज्यश्री क्षीरसागर**

*'अर्थबोधपत्रिके'तील माहिती कशी?*

- उद्‌बोधक, वाचनीय आणि रंजक
- अभ्यासपूर्ण आणि विश्लेषक
- नि:पक्ष व साधार
- सोप्या भाषेतील आणि विचारप्रवर्तक
- हाताशी असणाऱ्या मोजक्याच वेळात जगाबद्दलचे भान वाढविणारी

*'अर्थबोधपत्रिके'चा हेतू*

प्रतिष्ठित व अग्रगण्य नियतकालिके, पुस्तके आणि इंटरनेटसारख्या माध्यमांद्वारे राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर, मुख्यत: इंग्रजी भाषेत प्रकाशित होणारी जी माहिती मराठी वाचकांपर्यंत सहजतेने पोचत नाही, अशी वेचक माहिती संदर्भासह पुरविणे.

*'अर्थबोधपत्रिका'कशी साकारते?*

- मूळ इंग्रजी संदर्भाचा शोध व वाचन
- निवडक साहित्याचे संकलन
- संकलित साहित्याला अन्य पूरक माहितीची जोड
- संकलित माहितीच्या आधारे नव्याने लेखन. मूळ इंग्रजी संदर्भाचा केवळ अनुवाद नव्हे.

◆या अंकातील मजकुराबाबत आपण आपल्या सूचना आणि/किंवा अभिप्राय संपादकांच्या नावे संस्थेच्या पत्त्यावर पाठवावेत, ही विनंती.

◆अंकातील लेख आपण नियतकालिकात/वृत्तपत्रात प्रसिद्ध करू शकता. मात्र, लेख प्रसिद्ध केल्यावर त्याखाली **'अर्थबोधपत्रिका, भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीच्या सौजन्याने'** अशी ओळ प्रसिद्ध करावी एवढीच अपेक्षा आहे.**यासाठी संस्थेतर्फे मूल्य आकारण्यात येणार नाही. मात्र लेख प्रसिद्ध केलेला अंक संस्थेला अवश्य पाठवावा.**

जनतेत क्षोभ उत्पन्न करण्यापेक्षा तिच्यात विचार उत्पन्न करणे हे किती-तरी महत्त्वाचे आणि कठीण कार्य आहे. - तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी.

# युगांतर

किती गंमत आहे पहा ! संदेशवहन आणि दळणवळणातील अपूर्व क्रांतीद्वारे विलक्षण जवळ आलेल्या, एकत्र घट्ट गुंफल्या गेलेल्या जगाला तुम्ही-आम्ही सारेजण आज खेड्याची उपमा देतो. जगाचा उल्लेखदेखील आपण हल्ली 'ग्लोबल व्हिलेज' असाच करतो. मात्र, जेमतेम आणखी साडेतीन, फार फार तर, चारच महिन्यांनी 'ग्लोबल व्हिलेज' हा एक वदतोव्याघातच ठरावा. तुम्ही विचाराल की असे का ?... चालू वर्षातील डिसेंबर महिना सरला की संपून संपूर्ण जग नवीन वर्षात पदार्पण करेल. कालगणनेच्या दृष्टीनेच केवळ नवीन वर्षात नव्हे तर, जगाचा हा प्रवेश असणार आहे संपूर्णतया नवीन मनू असलेल्या नवयुगात, नवविश्वात. हे विश्व असणार आहे - 'शहरी' अथवा 'नागरी' विश्व. जागतिक लोकसंख्येसंदर्भात संयुक्त राष्ट्रांनी अलीकडेच प्रकाशित केलेल्या ताज्या अहवालानुसार, २००८ साली जगाच्या एकंदर लोकसंख्येपैकी तब्बल निम्मी लोकसंख्या ही शहरवासी असेल, नागर असेल. एका अर्थाने जगाचे हे मोठे सीमोल्लंघनच ठरावे. सुमारे, ६६० कोटी लोकसंख्येपैकी ३३० कोटी माणसे नगरा-महानगरांमध्ये वास करणार ही साधीसुधी बाब नाही. आता तुम्हीच सांगा, अशा या जगाला 'ग्लोबल व्हिलेज' असे कसे संबोधावे ?... एवढ्या प्रचंड शहरी लोकसंख्येचे व्यवस्थापन करण्यात सर्वच पातळ्यांवरील प्रशासकीय व्यवस्था-यंत्रणांची कसोटी लागणार आहे. येणाऱ्या दोन-अडीच दशकांत हीच नागरी लोकसंख्या ५०० कोटींवर जाऊन पोहोचेल, असाही कयास या अहवालात व्यक्त करण्यात आला आहे. भविष्याबाबत अशा प्रकारचे अंदाज बांधण्यावर विश्वास नसलेले काही तर्कनिष्ठ संशोधक-विद्वान उद्याच्या नागरी लोकसंख्येच्या आकारमानाबाबत वर्तविण्यात आलेल्या या आकड्यांच्या यथार्थतेबाबत, अचुकतेबाबत शंका-कुशंका प्रदर्शित करतीलही. ही गणती काही प्रमाणात कदाचित चुकेलही. परंतु, त्यामुळे वास्तव मात्र बदलणार नाही. ५० टक्के जग शहरी बनणे म्हणजे कपडालत्ता, निवारा, खानपान, करमणूक यांबाबतच्या सवयी, संकेत,

*(पृष्ठ ३६ वर पाहावे)*

# वाचकांचा प्रतिसाद

'अर्थबोधपत्रिके'च्या ऑगस्ट २००७च्या अंकातील सर्वच लेख माहितीपूर्ण आहेत. अंक वाचल्यानंतर मनात आलेले विचार असे - (१) इराणमध्ये लोकशाहीवादी गट काही प्रमाणात कार्यरत आहे, असे आपल्या अंकातील लेखावरून समजते. मुस्लिम राष्ट्रांचा विचार केला तर पाकिस्तानमधील घडामोडी आपल्या परिचयाच्या झाल्या आहेत. पण अन्य मुस्लिम देशांमध्येही लोकशाही राज्यव्यवस्था व प्रणालीच्या स्थापनेबाबत काही घडते आहे किंवा कसे, याचीही माहिती वाचकांना उपलब्ध करून देण्याबाबत आपण विचार करावा. (२) अंमली पदार्थांच्या बाजारपेठेविषयीच्या लेखात आपण अंमली पदार्थांचे उत्पादन व बाजारपेठ यांवर नियंत्रण आणण्याबाबतचा उल्लेख केला आहे. पण, मुळात अंमली पदार्थांचे व्यसनच लागू नये वा अशी व्यसनाधीनता वाढत असल्यास व्यसनमुक्त होण्यासाठी काय काय करता येईल, या दिशेनेही जगभरात कोठे कोठे काय प्रयत्न आणि ते कोणत्या पातळीवर सुरू आहेत, याबाबतचा काही तपशील पुरविला असता तर या चित्राची ही बाजूदेखील वाचकांसमोर आली असती. (३) 'उद्योगांनी आरंभला 'उद्योग' प्रशिक्षणाचा' हा लेख वाचून असे वाटले की आपल्याकडे एखादे औद्योगिक विद्यापीठ (Industrial University) स्थापन करता येणार नाही का ? त्या दृष्टीने देशविदेशांत कुठे विचारविनिमय सुरू झाला आहे का, या संदर्भातील काही माहिती उपलब्ध असल्यास तीही वाचायला आवडले असते. (४) अमेरिकेत ज्या क्षेत्रांत मनुष्यबळाची कमतरता आहे व जे मनुष्यबळ इतर देशांकडून, विशेषतः भारताकडून, उपलब्ध होते (म्हणजे प्रामुख्याने संगणक अभियंते व माहिती-तंत्रज्ञान क्षेत्रातील अभियंते) त्या क्षेत्रांचे शिक्षण अमेरिकेतील विद्यार्थी का घेत नाहीत ? ...की अशांचे प्रमाण अल्प आहे म्हणून त्याचा विचार लेखात झाला नाही ?

**मोहन मार्डीकर, नागपूर**

धर्म, विज्ञान, पर्यावरण, आर्थिक, सामाजिक अशा विविध जीवनांगांसंबंधी 'अर्थबोधपत्रिके'त वेळोवेळी प्रसिद्ध होणारे लेख वाचनीय व उद्बोधक असतात. 'सेझ'बाबत आपण काही लेख प्रसिद्ध केले आहेत. चीनमधून आयात करण्यात आलेली ही संकल्पना भारताला भुरळ पाडते आहे, असे म्हटल्यावाचून राहावत

*(पृष्ठ ३६ वर पाहावे)*

# 'शहरी' विश्वाचा नकाशा

निम्मे जग नागरी बनणे, ही एक ऐतिहासिक घटनाच मानली पाहिजे. टेलिफोन, इंटरनेट, माहिती-तंत्रज्ञानाधारित सेवा या साऱ्या आयुधांच्या साहाय्याने घट्ट गुंफल्या गेलेल्या जगाचा, 'ग्लोबल व्हिलेज' म्हणून निर्देश करणे हा त्या निम्म्या शहरी (निमशहरी नव्हे !) जगाचा पुढील वर्षापासून जणू अपमानच ! पुढच्या वर्षी सुमारे ३३० कोटींच्या घरात असणारी 'शहरी जगा'ची लोकसंख्या २०३० सालापर्यंत ५०० कोटींवर जावी, ही (अपेक्षित) बाब साधीसुधी अजिबातच नाही. एवढ्या प्रचंड संख्येचे आणि या अवाढव्य लोकसंख्येला सामावून घेणाऱ्या अस्ताव्यस्त शहरांचे किमान कार्यक्षम नियोजन -नियमन -व्यवस्थापन करणे, हे एक दिव्यच ठरणार आहे.

या अफाट वाढविस्ताराला आणखी एक मनोज्ञ पैलू असणार आहे आणि तो म्हणजे यातील बव्हंश वाढ ही मुख्यत्वे तिसऱ्या जगातील विकसनशील देशांमध्येच घडून येणार असल्याचे भाकित. सन २००० ते २०३० या केवळ तीन दशकांच्या कालखंडात आफ्रिका आणि आशिया खंडांतील नागरी लोकसंख्या एकदम दुपटीने वाढेल असा वर्तविला जाणारा अंदाज या संदर्भात बोलका ठरतो. विकसित देशांमधील शहरांच्या वाढीची प्रक्रिया इथून पुढच्या काळात पार गोठूनच जाईल, असा मात्र याचा अर्थ अजिबात नाही. मात्र, विकसनशील देशांमध्ये घडून येणाऱ्या नागरी वाढीच्या तुलनेत विकसित देशांमधील शहरी लोकसंख्येत पडणारी भर ही बरीच नेमस्त असेल, हाच या साऱ्या अंदाज-भाकितांचा इत्यर्थ.

या सगळ्यावरून एक गोष्ट अगदी सूर्यप्रकाशाइतकी स्पष्ट आहे आणि ती अशी की विकसनशील देशांमधील शहरे आगामी काळात अतिशय महत्त्वाची भूमिका बजावतील, ही. जागतिकीकरणाच्या आजच्या झपाट्यात एकूणच तिसरे जग जागतिक समुदायात आणि विशेषत: जागतिक बाजारपेठेत वेगाने गुंफले जात आहे. या बरोबरच विविध देशांमध्ये अर्थविकासाची प्रक्रिया कमीअधिक प्रमाणात आणि वेगवेगळ्या प्रकारे वेग पकडताना दिसते. आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत शहरे ही नेहमीच आघाडीवर राहतात, हाच शहरीकरणाच्या आजवरच्या इतिहासाचा दाखला आहे. त्यामुळे, जागतिक

*(पृष्ठ ८ वर पाहावे)*

## आलेख 'शहरी' भारताचा.....

नागरीकरणाच्या पातळीचा विचार केला तर, २००१ सालच्या जनगणनेनुसार असणारी भारतातील शहरीकरणाची सरासरी २७.७८ टक्के ही पातळी तशी काही फार नाही. याचा अर्थ असा की, १०० भारतवासियांपैकी सरासरी साधारणतः २८ भारतीय हे नागरी अथवा शहरी भागांत राहतात. परंतु, ही झाली चित्राची केवळ एकच बाजू. या वास्तवाची दुसरी बाजूही ध्यानात घ्यावयास हवी. लहान-मोठ्या आकाराच्या एकंदर ५ हजार १६१ नागरी केंद्रांमध्ये सामावलेल्या तब्बल २८ कोटी ५५ लाख ४३ हजार ७२१ शहरी भारतीयांचे शहरी जीवन सुखावह, किमान आरामदायी व्हावे या दृष्टीने मूलभूत नागरी सुविधांचा पुरवठा आणि देखभाल करणे, नगरा-महानगरांचे व्यवस्थापन कार्यक्षम पद्धतीने राबविणे ही स्थानिक स्वराज्य संस्थांची खरोखर कसोटीच! 'शहरी' भारताचा आलेख ही एक मोठी विलक्षणच बाब आहे. थोडेथोडके नाही तर, चांगले साडेअठ्ठावीस कोटी 'शहरी भारतीय' ही संख्याच छातीमध्ये धडकी भरविणारी. संपूर्ण जगातील नागरी लोकसंख्येशी असणारे भारतीय नागरी लोकसंख्येचे प्रमाण काढले तर ते जवळपास १० टक्के इतके भरते. उभ्या आशिया खंडातील नागरी लोकसंख्येचा विचार केला तर हेच प्रमाण भरते २१.१० टक्के इतके. सर्वसामान्य भारतीयाला '२८ कोटी ५५ लाख' या आकड्याचे कदाचित फारसे काही वाटणार नाही. कारण, तो तसा सरावलेला असतो एकंदर १०३ कोटी एवढ्या भरभक्कम आबादीला ! मात्र, आक्रसणाऱ्या लोकसंख्येचेच वास्तव ज्यांच्या हाडीमाशी खिळलेले आहे अशा काही पाश्चात्य देशांमधील रहिवाशांना '२८ कोटी ५५ लाख' ही संख्या अवाढव्यच वाटावी हे अतिशय स्वाभाविक म्हणावयास हवे. फ्रान्स वा जर्मनीसारख्या लहान देशांच्या एकंदर लोकसंख्येपेक्षाही 'शहरी' भारताची नागरी लोकसंख्या अधिक आहे, हेही एकवेळ समजू शकते. परंतु, अमेरिका वा ब्राझीलसारख्या आकारमानाने खणखणीत असणाऱ्या मोठ्या देशांच्या एकूण लोकसंख्येपेक्षाही नागरी भारताच्या लोकसंख्येचा पसारा मोठा आहे, हे ध्यानात घेतले की कोणीही अचंबितच होईल. छोट्या-मोठ्या देशांचे राहूच द्या, जगातील सर्वांत लहान उपखंड म्हणून गणल्या गेलेल्या ऑस्ट्रेलिया खंडाच्या एकंदर

लोकसंख्येपेक्षाही 'शहरी' भारताची लोकसंख्या जास्त आहे, हे कळले तर तुमची प्रतिक्रिया काय होईल ? भारतातील नगरा-महानगरांच्या मांदियाळीत एक-दोन नाही तर, चांगली ३५ महानगरे अशी आहेत की ज्यांनी १० लाखांहून अधिक रहिवाशांना उदार आश्रय दिला आहे. एकूण साडेअठ्ठावीस कोटी नागरी भारतीयांपैकी जवळपास ११ कोटी शहरी भारतीय याच ३५ शहरांमध्ये नांदतात. स्वतंत्र भारतातील पहिली जनगणना १९५१ साली झाली. त्या खानेसुमारीनुसार तत्कालीन भारताची नागरीकरणाची पातळी होती १७.५९ टक्के इतकी. एकंदर ३ हजार ३६ नागरी केंद्रांमध्ये ६ कोटी २० लाख ९८ हजार ८७८शहरवासी भारतीय तेव्हा राहत होते. त्या नंतरच्या चार दशकांत बदललेला शहरी भारताचा आलेख २००१ सालच्या जनगणना अहवालांतील आकडेवारीत डोकावतो. हा बदल मोठा लक्षणीय आहे. १९६१ ते २००१ या दरम्यान नागरीकरणाची पातळी साडेसतरा टक्क्यांवरून सुमारे २९ टक्क्यांपर्यंत उंचावली, तर, नागरी केंद्रांच्या संख्येत ३,०३६ वरून ५,१६१ पर्यंत वाढ घडून आली. मात्र, सगळ्यात घसघशीत भर पडली ती देशाच्या शहरी लोकसंख्येत ! शहरी भारताची लोकसंख्या ६ कोटी २१ लाखांवरून थेट २८ कोटी ५५ लाखांवर पोहोचली. या चित्राची खरी मजा इथेच तर आहे. १९६१ ते २००१ या कालावधीत देशातील नागरी केंद्रांच्या संख्येमध्ये १.७० पट, म्हणजे दुपटीपेक्षा अंमळ कमीच वाढ घडून आली. परंतु, शहरी लोकसंख्या मात्र चांगली साडेचार पटींहून अधिक वाढली. म्हणजेच, नागरीकरणाच्या प्रक्रियेच्या भौगोलिक विस्तारापेक्षाही नागरी लोकसंख्या वाढीचा वेग या चार दशकांत सातत्याने किती तरी अधिक राहिला. विविध स्तरांवर वेगवेगळ्या प्रकृतीच्या शहरांची निपज-वाढविस्तार होण्यापेक्षाही पूर्वापार अस्तित्वात असलेल्या शहरांच्या लोकसंख्येतच भर पडत राहिल्याचे हे लक्षण आहे. त्यातल्या त्यात यातही परत आघाडी घेतली ती ज्या शहरांमध्ये एक लाख वा त्यापेक्षाही अधिक लोकसंख्या एकवटलेली आहे, अशा शहरांनी. अशा शहरांमध्ये, १९५१ सालच्या नागरी लोकसंख्येपैकी सुमारे ४५ टक्के लोकसंख्या एकवटलेली होती. तर, २००१ सालच्या खानेसुमारीनुसार हेच प्रमाण तब्बल ६९ टक्क्यांपर्यंत दणकन उंचावले. 'शहरी' भारताचा आलेख हा असा आहे. ✿✿

(पृष्ठ ५ वरून)
स्तरावरील आर्थिक प्रगतीचा विचार, त्या प्रक्रियेत, शहरांच्या असलेल्या सहभागाशिवाय करणे हे केवळ अशक्यच नव्हे तर तर्कविसंगतच ठरेल.

हे आव्हान दुहेरी स्वरूपाचे असणार आहे. एक तर, विकसनशील देशांमधील शहरे आणि तिथे वास करणारे शहरवासी आजमितीस नाना प्रकारच्या नागरी समस्यांनी रंजीस आले आहेत. रस्ते, पाणी, वाहतूक, स्वच्छता, दळणवळण, नागरी पर्यावरण, कचरा निर्मूलन व मलनिःस्सारण, पायाभूत आरोग्य, निवासी घरांचा पुरवठा अशा पायाभूत शहरी सेवासुविधांची आजची अवस्था कमालीची बिकट आणि म्हणूनच असमाधानकारक बनलेली आहे. अतिशय थोड्या काळात अतिशय वेगाने घडून आलेल्या नागरीकरणामुळे उद्‌भवलेल्या सर्व स्वाभाविक अडचणींची मालिका या शहरांच्या प्रशासनांसमोर उभी आहे. विकसनशील देशांमधील नागरीकरणाची प्रक्रिया पुढील काळात अधिकच वेग पकडणार असेल तर आजच हाताबाहेर जात असलेल्या या समस्या अधिकच बिकट बनून अधिकच भेसूर, विकट रूप धारण करतील. मग त्यांचा मुकाबला करणे, हे केवळ दुरापास्तच बनून बसेल. तेव्हा या समस्यांवर लगोलग काही तरी परिणामकारक उतारा शोधून काढणे, हे पहिले आव्हान आहे.

याच्याशीच संलग्न असलेले दुसरे आव्हान हे अंमळ निराळ्या स्वरूपाचे असणार आहे. वेगाने विस्तारणारे शहरीकरण हे निव्वळ समस्यांचेच काय ते आगर अथवा भांडार असणार आहे, असा ग्रहही करून घेण्याचे कारण नाही. या प्रक्रियेच्या पोटात दमदार विकासाच्या अनेकानेक संधींही दडलेल्या सापडतील. विकासाच्या या शक्यता कोमेजून जाऊ नयेत यासाठी दक्ष राहत असतानाच त्या क्षमता-शक्यतांचे भरणपोषण घडावे यासाठी सुयोग्य धोरणे आखून त्यांची कार्यक्षम अंमलबजावणी करणे, हे ठरेल दुसरे आव्हान. या दृष्टीने कंबर कसावयाची असेल तर सर्वच स्तरांवरील शासन-प्रशासनाप्रमाणेच शहरी नागरिकांना तसेच नागरी संघटनांना आपल्या भूमिकांत, दृष्टिकोनांत, विचारपद्धतींत आमूलाग्र परिवर्तन घडवून आणावे लागेल. विस्तारणाऱ्या नागरीकरणाचे आव्हान पेलेल अशी अनुरूप धोरणे आखावी-राबवावी लागतील. मुख्य म्हणजे, शहरांच्या विकासाबाबतच्या आपल्या पूर्वापार धारणा बदलाव्या लागतील. 'ग्रामीण भाग' आणि 'शहरे' हे आपण आजवर मनोभावे जोपासलेले द्वैत आता कृत्रिम ठरत आहे, कालबाह्य ठरत आहे, याचे भान मनीमानसी बिंबवावे लागेल. कारण, 'खेडी' आणि 'शहरे' यांतील सीमारेषा आता जगभर सर्वत्रच धूसर होत

आहेत. अशा वेळी विकासाचा अधिक एकात्म विचार करणे भाग आहे. 'खेड्यांचा' विकास प्रयत्नपूर्वक घडवून आणावा लागतो तर 'शहरांची' वाढ ही स्वयंप्रेरक असते, ही धारणा आता बदलावीच लागेल.

याला कारणही तसेच बळकट आहे. मुळात, दळणवळण तसेच वाहतूक व प्रवासाच्या साधनांमध्ये घडून आलेल्या अप्रतिहत क्रांतीने आज अंतराचा अंत घडवून आणला आहे. सर्वच दृष्टीने 'खेडी' आणि 'शहरे' आज परस्परांच्या निकट आलेली आहेत. खेड्यांना वगळून शहरांचा, शहरांच्या प्रगतीचा, शहरनियोजनाचा विचार करणे अपर्याप्त आणि त्याहीपेक्षा अनैसर्गिक ठरते आहे. ग्रामीण भागांकडून शहरांकडे होणारे स्थलांतरण केवळ सातत्यशीलच नाही तर दिवसेंदिवस वर्धिष्णू आहे, ही एकच बाब या वास्तवाची साक्ष देते. एका बाजूला खुरटलेली, कुंठित ग्रामीण अर्थव्यवस्था आणि दुसरीकडे काही विशिष्ट कौशल्ये व प्रशिक्षणाने युक्त असणाऱ्यांनाच रोजगाराचे आश्वासन देणारी श्रमांची संघटित शहरी बाजारपेठ अशा विलक्षण कैचीपायी, वाढत्या स्थलांतरणाद्वारे ग्रामीण गरिबीबरोबरच शहरी गरिबीचे आव्हान उत्तरोत्तर सघन बनते आहे. येत्या काळात विस्तारणाऱ्या नागरीकरणाचा हा एक महत्त्वाचा पैलू ठरणार आहे. आगामी काळात, शहरांच्या लोकसंख्येत पडणारी भर ही मुख्यत्वेकरून आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील समाजसमूहांमुळे पडणे अपेक्षित आहे. रोजीरोटीच्या शोधार्थ शहरांच्या वाटा चोखाळणाऱ्या याच समाजघटकांचा पुरेसा विचार शहरनियोजनात नेमका होत नाही, हा काटेरी विरोधाभास उद्याच्या 'शहरी' विश्वात अधिकच खुपेल. कारण, या घटकांच्या ठायी असणाऱ्या उण्यापुऱ्या कारक, उत्पादक क्षमतांचा वापर शहराच्या वाढ-विकासासाठी कसा करून घ्यावयाचा यांबाबत पुरेशा संवेदनशीलतेने सकारात्मक विचार अभावानेच होताना दिसतो. शहरांवरील वाढता बोजा, अशा हिणकस भावनेनेच या स्थलांतरित घटकांकडे पाहिले जाते. त्यातही पुन्हा तुलनेने अधिक उपेक्षित राहतात त्या महिला व तरूण मुली.

### 'आर्थिक प्रगती -लोकसंख्या वाढ -शहरीकरण'

तिसऱ्या जगातील विकसनशील देशांच्या नागरी लोकसंख्येमध्ये आगामी काळात अपेक्षित असणारी घसघशीत वाढ ही 'आर्थिक प्रगती -लोकसंख्या वाढ -शहरीकरण' या चक्रनेमिक्रमाच्या दुसऱ्या लाटेचे अपत्य असेल, असे या क्षेत्रातील अभ्यासक -संशोधकांचे विश्लेषण आहे. ही दुसरी लाट पहिल्या लाटेपेक्षा किती तरी अधिक मोठी आणि वेगवान असेल, असेही प्रतिपादन केले जात आहे. आर्थिक

प्रगती, त्यातून लोकसंख्या वाढीस मिळणारी चालना आणि या दोहोंद्वारे निपजणारे शहरीकरण या तीन परस्पराश्रयी प्रक्रियांची पहिली लाट जगामध्ये १८व्या शतकाच्या पूर्वार्धात येऊन गेली, असे मानले जाते. ही लाट प्रथमतः उगम पावली ती युरोप आणि उत्तर अमेरिकेत. साधारणपणे इ. स. १७५० ते १९५० अशी तब्बल दोन शतके या लाटेचा प्रभाव टिकून राहिला. ज्ञान-विज्ञानातील सुधारणा आणि औद्योगीकरण यांतून ही लाट सक्रिय बनली. त्यातून आर्थिक प्रगतीची चाके फिरू लागली आणि या दोहोंतून लोकसंख्या वाढीस चालना मिळाली. आज जगाच्या पाठीवर ठयीठायी विखुरलेला शहरी -नागरी समाज ही या लाटेचीच निष्पत्ती.

आज, 'आर्थिक प्रगती -लोकसंख्या वाढ -शहरीकरण' ही दुसरी लाट विकसनशील देशांमध्ये साकारत आहे. मात्र, दोन्ही लाटांमध्ये लक्षणीय फरक असणार आहे. शहरीकरणाची पहिली लाट तुलनेने संथ होती. त्या मानाने अल्पशा भूभागापुरताच तिचा विस्तार मर्यादित राहिला. त्या लाटेच्या लपेट्यात आलेल्या लोकसंख्येचे आकारमानही तसे फारसे नव्हते. 'वेग - व्याप्ती - आकारमान' या तीनही परिमाणांचा विचार करता, आता येऊ घातलेली दुसरी लाट मात्र पहिल्या लाटेपेक्षा खूपच मोठी असेल. विकसनशील देशांमधील शहरांसमोर आज उभ्या असलेल्या आव्हानांच्या जंत्रीची तीव्रता अधिक वाढविण्यात या दुसऱ्या लाटेची परिणती होईल, अशी सार्थ भीती वर्तविली जात आहे. लोकसंख्या वाढीच्या पहिल्या लाटेमधून उद्भवलेल्या समस्यांवर युरोपीय देशांना तेव्हा आंतरराष्ट्रीय स्थलांतरणाच्या रूपाने निदान एक उतारा तरी उपलब्ध होता. लोकसंख्येत वाढ घडून येत असतानाच युरोपीय देशांमधील अनेकांनी अमेरिकेचा पंथ पकडला. नवनवीन प्रदेशांत वस्ती केली. पिकाऊ परंतु लागवडीखाली न आणली गेलेली जमीन पिकवली. आज जागतिकीकरण तसेच वाहतूकीच्या तंत्रज्ञानातील अपूर्व प्रगतीपायी जग जवळ आलेले असले तरी आंतरराष्ट्रीय स्थलांतरणाबाबतचे देशोदेशीचे कायदेकानू अधिक जाचक आणि कडक बनले आहेत. त्यामुळे लोकसंख्या वाढीचा भार, अंशतः का होईना, सुसह्य होण्याचा हा मार्ग संकुचित आणि दुष्कर बनला आहे, बनत आहे.

युरोप आणि उत्तर अमेरिकेत आलेल्या नागरीकरणाच्या पहिल्या लाटेदरम्यान, म्हणजे इ.स. १७५० ते १९५० या दोन शतकांच्या काळात, नागरीकरणाची सरासरी पातळी १० टक्क्यांवरून ५२ टक्क्यांपर्यंत उंचावली. शहरवासियांची संख्याही साधारणपणे दीड कोटींवरून ४२-४३ कोटींपर्यंत वाढली. याच्या तुलनेत, विकसनशील देशांमध्ये आता येऊ घातलेल्या लोकसंख्या वाढ आणि नागरीकरणाच्या दुसऱ्या लाटेचा आकार

आणि तिची व्याप्ती ही केवळ भयप्रदच आहे. १९५० साली विकसनशील देशांमधील नागरी लोकसंख्या केवळ ३१ कोटींच्या आसपास होती. आणखी जेमतेम दोन दशकांतच, म्हणजे, २०३० सालापर्यंत ही शहरी लोकसंख्या थेट ३९० कोटींवर जाईल, असा एक अंदाज आहे. १९५० ते २०३० या केवळ ८० वर्षांच्या काळात विकसनशील देशांमधील नागरीकरणाची सरासरी पातळी १८ टक्क्यांवरून जवळजवळ ५६ टक्क्यांपर्यंत उंचावेल, असे दिसते. हा झपाटा केवळ अपूर्व असाच आहे. २० व्या शतकाच्या प्रारंभी, विकसित देशांमधील शहरवासियांची संख्या विकसनशील देशांमधील नगरवासियांच्या संख्येपेक्षा दुपटीहून अंमळ अधिकच होती. आजचे चित्र काय आहे ....? आजमितीस, गरीब देशांमधील शहरवासियांची संख्या ही विकसित देशांमधील नागर लोकसंख्येच्या जवळपास दीड पटीहून अधिक आहे !

तसे पाहिले तर, शहरी विस्ताराची आणि पर्यायाने नागरीकरणाची प्रगती संपूर्ण २० वे शतक व्यापून उरली होती. उभ्या जगातच नागरीकरणाचा विस्तार गेल्या शतकात तसा झपाट्यानेच झाला. इ.स. १९०० मध्ये जेमतेम २२ कोटींच्या घरात असलेली जगभरातील नागरी लोकसंख्या सन २०००पर्यंत पार २८४ कोटींवर गेली. म्हणजेच, गेल्या शतकभरात जगाच्या शहरी लोकसंख्येत चांगली २६२ कोटींची भर पडली. मात्र, आता येऊ घातलेल्या शहरीकरणाच्या दुसऱ्या लाटेचा वेग आणि झपाटा असा विलक्षणच संभवतो की, गेल्या शतकभरादरम्यान जगाच्या शहरी लोकसंख्येत जेवढी संख्यात्मक वाढ घडून आली तेवढी वाढ आगामी केवळ ४० वर्षांतच घडून येईल, असे भविष्य सांगितले जाते. आता बोला !

**भौगोलिक वा प्रादेशिक विस्तारही महत्त्वाचा**

सगळ्यात मजेशीर असणार आहे तो या अवाढव्य शहरी वाढीचा भौगोलिक वा प्रादेशिक विस्तार. सन २००० ते २०३० या केवळ तीनच दशकांदरम्यान आशिया खंडाची शहरी लोकसंख्या १३६ कोटींवरून २६४कोटींवर जावी. लॅटिन अमेरिका आणि कॅरेबियन देशांची नागरी लोकसंख्या याच काळात साधारणपणे ३९ कोटींवरून ६१ कोटींपर्यंत वाढेल. तर, आफ्रिका खंडाची शहरी लोकसंख्या २९ कोटींवरून ७४ कोटींवर जाईल, असे अंदाज व्यक्त करण्यात येत आहेत. एक बाब इथे लक्षात ठेवलीच पाहिजे आणि ती अशी की हे सारे अदमास आहेत. भविष्यातील नागरी वाढीची ढोबळ परिमाणे रेखाटणारे अंदाज. हे कितपत खरे होतील, ते काळच ठरवील. मात्र, विकसनशील देशांसमोर आणि विशेषतः त्या देशांमधील नागरी प्रशासनांसमोर

आगामी काळात कोणत्या प्रकारची आव्हाने उभी ठाकतील, याची निदान कल्पना तरी या रेखाटनांवरून निश्चितच यावी. समजा, हे अंदाज अगदी तंतोतंत नाही परंतु, गेला बाजार काही अंशी जरी खरे ठरले तरी, २०३० सालच्या जगातील एकूण शहरी लोकसंख्येपैकी थोडीथोडकी नाही तर तब्बल ९० टक्के शहरी लोकसंख्या ही तत्कालीन जगातील विकसनशील देशांमध्येच काय ती एकवटलेली असेल ! यातून जटिल बनणार आहेत त्या शहर व्यवस्थापनाच्या समस्या. एवढ्या प्रचंड संख्येने शहरांत लोटलेल्या लोकसंख्येला नोकऱ्या आणि उदरनिर्वाहाची साधने आपण कोठून शोधून देणार आहोत ?

शहरांकडे धाव घेणारे स्थलांतरित हे बहुतेक वेळा रोजगाराच्या शोधार्थ बाहेर पडलेले असतात. वेगवेगळ्या आकारमानाची शहरे पुन्हा वेगवेगळ्या वेगाने आणि प्रकारे वाढत असल्याने स्थलांतरणाचे प्रवाहही मोठे मजेशीरच दिसतात. मात्र, कोणत्याही आकारमानाच्या लहान-मोठ्या शहरांमधील श्रमांच्या बाजारपेठेत रोजगाराची मागणी ज्या प्रमाणात वाढत आहे त्या प्रमाणात आणि त्या प्रकारच्या रोजगार संधी निर्माण करण्यात विकसनशील देशांमधील फारच थोड्या शहरांना यश येताना दिसते. त्याच वेळी वेगाने विस्तारणाऱ्या नागरीकरणाच्या लाभांचे वाटपही शहरांतर्गत विविध जनसमूहांमध्ये विषम पद्धतीने होत असल्याचा अनुभव येतो. ग्रामीण भागांतील बेरोजगारी आणि त्याच्याच पाठोपाठ येणारी गरिबी आता गरीब देशांमधील मोठ्या शहरांमध्येही एकवटताना का दिसते, याचे उत्तर इथे सापडते. परिणामी, विकसनशील देशांच्याबाबतीत ग्रामीण दारिद्र्याइतकेच नागरी दारिद्र्याच्या निराकरणाचे आव्हानही दिवसेंदिवस बिकट होत आहे.

शहरीकरणाच्या प्रक्रियेचा जगभरच आढळून येणारा आणखी एक विशेष म्हणजे वेगवेगळ्या आकारमानांची शहरे निरनिराळ्या गतीने वाढताना दिसतात. थोड्या वेगळ्या शब्दांत सांगावयाचे तर, शहरांच्या वाढविस्तारात एक प्रकारची विषमता आढळून येते. लोकसंख्येच्या दृष्टीने मोठी असलेली महानगरे अधिक मोठ्या प्रमाणावर लोकसंख्या आपल्याकडे आकर्षित करतात आणि साहजिकच अधिक वेगाने वाढतात, असाच ठिकठिकाणचा अनुभव आहे. साहजिकच, एखाद्या देशातील एकंदर नागरी लोकसंख्येचे विविध आकारमानांच्या शहरांतील विभाजन बघितले तर असे दिसते की आकाराने मोठ्या असलेल्या महानगरांतच त्या देशातील एकूण नागरी लोकसंख्येपैकी खूप मोठा हिस्सा हा केंद्रीभूत झालेला असतो.

## असमतोल भारतातील शहरीकरणाचा

भारतीय नागरीकरणाचा नकाशा जरी वानगीदाखल बघितला तरी वेगवेगळ्या आकारमानांच्या शहरांच्या वाढीतील हा असमतोल डोळ्यांना चांगलाच खुपतो. केवळ इतकेच नाही तर, हा असमतोल स्वातंत्र्यानंतरच्या गेल्या सहा दशकांत सातत्याने वाढलेलाच आहे, हे वास्तवही ध्यानात येते. २००१ सालच्या जनगणनेनुसार, एक लाख वा त्यापेक्षा अधिक लोकसंख्या असणारी ३९३ शहरे भारतामध्ये होती. याच खानेसुमारीनुसार, २००१ साली वेगवेगळ्या आकाराची एकंदर ५ हजार १६१ नागरी केंद्रे देशभरात होती. आता, ५ हजार १६१ पैकी ३९३, हे जर प्रमाण काढले तर ते येते अवघे आठ टक्के. २००१ सालातील एकूण नागरी लोकसंख्येपैकी जवळपास ६९ टक्के नागरी लोकसंख्या एकूणांतील या केवळ आठ टक्के नागरी केंद्रांमध्ये एकवटलेली होती, ही बाब ध्यानात घेतली की भारतातील शहरीकरणात मुरलेला असमतोल खाडकन नजरेसमोर उभा ठाकतो. मजा म्हणजे, १९५१ सालीही परिस्थिती अजिबात वेगळी नव्हती. १९५१ सालच्या जनगणनेनुसार, देशातील तत्कालीन नागरी लोकसंख्येपैकी तब्बल ४५ टक्के नागरी लोकसंख्या देशभरातील केवळ अडीच-पावणेतीन टक्के नागरी केंद्रांमध्ये (२ हजार ८४३ पैकी ७६) एकवटलेली होती !

नागरीकरणाच्या आता येऊ घातलेल्या दुसऱ्या लाटेदरम्यान मात्र विकसनशील देशांमध्ये वेगळे चित्र दिसण्याच्या शक्यता अभ्यासक वर्तवित आहेत. अभ्यासकांच्या प्रतिपादनानुसार, इथून पुढच्या काळात लोकसंख्या, आकारमान तुलनेने कमी असलेली शहरेच नागरीकरणाच्या विस्तारात आघाडीवर राहतील. अलीकडच्या काही दशकांत ती तशी बिनीवरच राहत आलेली आहेत. जगभरातील एकंदर नागरी लोकसंख्येचा आणि वेगवेगळ्या आकारमानांच्या शहरांमध्ये तिच्या झालेल्या विभाजनाचा आलेख न्याहाळला तर असे दिसते की एकूणांतील जवळपास ५२ टक्के नागरी लोकसंख्या ही पाच लाखांपेक्षा कमी लोकसंख्या असलेल्या शहरांत एकवटलेली आहे (जागतिक स्तरावर 'पाच लाख' ही लोकसंख्या 'लहान' म्हणून गणली जात असली तरी, भारतासारख्या देशाच्या दृष्टीने पाच लाख हा आकडाही तसा खूपच मोठा म्हणावयास हवा. कारण, लोकसंख्येच्या आकारमानानुसार भारतातील नागरी केंद्रांची जी सहा स्तरी उतरंड मांडली जाते त्या उतरंडीमध्ये पाच हजार ते वीस हजार लोकसंख्येच्या नागरी केंद्रांचा निर्देश हा 'लहान नागरी केंद्रे' म्हणून केला जातो. 'शहरे' म्हणून ज्या नागरी केंद्रांना निर्देशित केले जाते अशा, उतरंडीत पहिल्या स्तरावर असणाऱ्या नागरी

केंद्रांची लोकसंख्या एक लाख वा त्यापेक्षा अधिक असते). जगभरातील शहरांच्या लोकसंख्येमध्ये आगामी काळात अपेक्षित असलेल्या वाढीपैकी बहुतांश वाढ ही पाच लाखांपेक्षा कमी लोकसंख्या असणाऱ्या शहरांतच घडून येईल, असा संशोधक-अभ्यासकांचा अंदाज आहे.

हा अदमास एकाच वेळी आश्वासक, दिलासादायक आणि चिंताजनकही आहे. तुम्ही म्हणाल की हा असा विरोधाभास का ? त्याचेही उत्तर देण्याचा प्रयत्न अभ्यासकांनी केला आहे. शहरीकरणाच्या अभ्यासकांच्या मते, कोणत्याही शहराची लोकसंख्या, विस्तार जेव्हा अप्रतिहत वाढतो तेव्हा साहजिकच बदलत्या वास्तवाला सामोरे जाण्यासाठी, नागरीकरणाच्या प्रक्रियेत निपजणारे नवनवीन प्रवाह स्वीकारून ते जिरविण्यासाठी आवश्यक असणारी लवचिकता ही अस्ताव्यस्त पसरलेली अवाढव्य शहरे हरवून बसतात. शहरांचे आकारमान जेवढे मोठे तेवढी त्याच्या व्यवस्थापनासाठी कार्यान्वित करावी लागणारी प्रशासकीय यंत्रणा मोठी आणि साहजिकच गुंतागुंतीची. अशी प्रशासकीय यंत्रणा जेवढी मोठी तेवढी निर्णयप्रक्रिया किचकट आणि मंद. निर्णयप्रक्रिया जेवढी किचकट, मंद आणि वेळखाऊ तेवढी बदलत्या वास्तवाला प्रतिसाद देण्याची त्या शहराची क्षमता कमकुवत. जागतिकीकरणाच्या वेगवान लपेट्यात स्वतःला सामावून घेवून शहरांच्या जागतिक साखळीत विराजमान होण्यासाठी नवनवीन गुंतवणूक, उद्योग-व्यवसाय स्वतःकडे आकर्षित करण्यात ही अशी अवाढव्य शहरे मग मंद, अक्षम निर्णयप्रक्रिया, अकार्यक्षम प्रशासन आणि खालावलेल्या पायाभूत सुविधांपायी अपयशी ठरतात. लहान आकारांच्या शहरांना या वैगुण्यांचा विळखा पडलेला नसल्याने जागतिकीकरणाद्वारे त्यांच्या विकासक्षमता धुमारण्याच्या शक्यता अबाधित राहतात.

त्याच वेळी, लहान शहरांच्या मर्यादांकडेही दुर्लक्ष करता येत नाही. पायाभूत नागरी सुविधांचा पुरवठा आणि देखभाल-दुरुस्ती करण्यासाठी अनिवार्य असणाऱ्या वित्तीय, प्रशासकीय आणि तांत्रिक तरतुदींची वानवा लहान शहरांच्या ठायी जाणवते. परिणामी, जागतिकीकरणाच्या आजच्या काळात शहरांच्या वैश्विक पंगतीत पान मिळविण्याच्या मानास ती मुकतात. कारण, निकृष्ट अथवा असमाधानकारक अशा पायाभूत नागरी सेवासुविधा आणि तुलनेने दुर्बळ अशा प्रशासकीय क्षमता यांपायी परदेशी भांडवल, आंतरराष्ट्रीय स्तरावरील उद्योगधंदे आकर्षित करण्यात ही शहरे मागे पडतात. शहरांच्या आकारमानाशी संलग्न असणारा हा विरोधाभास इथे असा प्रगटतो. त्यापायीच उद्याच्या 'शहरी' विश्वाचा नकाशा हा रंगीबेरंगी दिसावा. ✿✿

# कशी निर्माण होतात शहरे ?

नागरीकरणाची वाटचाल ही सर्वसाधारण आर्थिक विकासाच्या प्रक्रियेची जणू चालतीबोलती पावतीच. कारण, नवनवीन शहरांच्या आकारमानात, त्यांच्या लोकसंख्येत भर पडणे, लहानमोठ्या खेड्यांचे -गावांचे रूपांतरण शहरांमध्ये होणे, एखाद्या देशातील शहरांची साखळी अधिक वैविध्यपूर्ण बनणे या साऱ्या बाबी त्या देशाचे अर्थकारण गतिशील असल्याच्या द्योतक ठरतात. नागरीकरणाची पातळी उंचावणे (कोणत्याही एखाद्या देशाच्या एकंदर लोकसंख्येपैकी जेवढी लोकसंख्या, जितकी टक्के लोकसंख्या त्या देशातील शहरांमध्ये वास करते, त्यावर त्या देशाच्या नागरीकरणाची पातळी निश्चित होते) हे आर्थिक विकासाची वाटचाल एका विशिष्ट टप्प्यापर्यंत पोहोचल्याचे लक्षण मानले जाते. अर्थव्यवस्थेमध्ये जे निरनिराळे बदल घडून येत असतात, अर्थकारणातील विविध घटकांचे परस्परांशी असणारे संबंध ज्या पद्धतीने बदलत असतात त्या बदलांचे प्रतिबिंब नगरा-महानगरांच्या वाढीमध्ये पडते. म्हणूनच, उभ्या जगातील जवळपास निम्मी लोकसंख्या आता शहरी बनणार याचाच अर्थ हा की एकंदर जगाचीच अर्थव्यवस्था तिच्या प्रगतीच्या एका विशिष्ट टप्प्यावर येऊन आता उभी ठाकली आहे.

हे सारे बदल समजावून घेण्यासारखेच आहेत. शेती, उद्योग आणि सेवा हे कोणत्याही अर्थव्यवस्थेतील तीन मुख्य उत्पादक घटक मानले जातात. शहरांची निर्मिती आणि वाढ यांचा संबंध अर्थकारणातील या तीन घटकांच्या विकासाशी आणि त्याचबरोबर त्यांच्या परस्पर नात्यातील बदलांशी जोडलेला असतो. सगळ्यात महत्त्वाचा ठरतो तो शेतीचा विकास. शेतीची उत्पादकता, उत्पादन आणि शेतीवर उदरनिर्वाह अवलंबून असलेल्यांच्या उत्पन्नात त्यामुळे पडणारी भर या तीन गोष्टींद्वारे शहरीकरणाच्या विकास-विस्ताराला प्राणवायू मिळतो. त्यामुळेच, शहरांची वाढ आणि त्याद्वारे होणारा नागरीकरणाचा विस्तार यांची नाळ शेतीमध्ये घडून येणाऱ्या सुधारणांशी, शेतीच्या विकासाशी जुळलेली आहे. शेतीची उत्पादकता वाढली की शेतीचे, शेतमालाचे उत्पादन वाढते, अन्नधान्याच्या उपलब्धतेत त्यामुळे वाढ होते. स्वतःचे पोट भरण्यासाठी स्वतःपुरते अन्नधान्य निर्माण करण्याच्या अनिवार्यतेमधून मुक्त झालेल्यांचा समूह, त्यामुळे,

समाजात नांदू लागतो. काळाच्या ओघात या समूहाचे वा अशा समूहांचे एखाद्या ठिकाणी केंद्रीकरण होते आणि त्या ठिकाणी 'शहर' या संकल्पनेचे बीज रु जते. कारण, शेतीवर उपजीविका थेट वा प्रत्यक्षपणे अवलंबून नसलेल्यांचे केंद्रीकरण, अशांची काही किमान लोकसंख्या आणि अशा लोकसंख्येचे एखाद्या भूभागावर वा प्रदेशात होणारे केंद्रीकरण ही 'शहर' या संकल्पनेच्या निर्मितीची अनिवार्य पूर्वअट असते. या समूहाच्या ठायी असणाऱ्या उत्पादक शक्तींचा वापर मग, शेतीखेरीज अन्य व्यवसायांकडे वळविता येतो, वळतो. यातूनच अर्थव्यवस्थेतील उद्योगांसारख्या वस्तुनिर्माण तर व्यापार, देवाणघेवाण, वाहतूक, पर्यटन, बँकिंग, विम्यासारख्या सेवाप्रधान क्षेत्रांचा विकास वाटचाल करू लागतो.

या विकासाला शेतीच्या प्रगतीचा हातभार आणखी दोन प्रकारे लागतो. उद्योगांच्या वाढीसाठी आवश्यक असणारा कच्चा माल आणि शेतीच्या विकासामुळे त्या व्यवसायात गुंतलेल्यांच्या उत्पन्नात वाढ घडून येऊन त्याद्वारे समाजाच्या एका मोठ्या घटकाच्या ठयी तयार झालेली क्रयशक्ती या दोन्हीमुळे उद्योग क्षेत्राची पाळेमुळे विस्तारू लागतात. उद्योगांच्या विकासाची गोमटी फळे शेतीला चाखता येतात. औद्योगिक विकासामुळे एकंदरच यंत्रतंत्रात्मक प्रगतीचा वेग वाढतो आणि शेतीसाठी उपयुक्त असणारी अनेक प्रगत अवजारे, हत्यारे, उपकरणे अस्तित्वात येतात. त्यामुळे शेतीमधील उत्पादनपद्धती सुधारण्यास हातभार लागतो. त्या सुधारणांची परिणती शेतीची उत्पादकता वाढण्यात होते. त्यातून शेतीचे उत्पादन, औद्योगिक कच्चा माल, शेतीवर अवलंबून असलेल्यांचे उत्पन्न व त्यांची क्रयशक्ती यांत भर पडते. त्यातून परत उद्योगांना चालना मिळते.... आणि हा चक्रनेमिक्रम पुढे चालूच राहतो. औद्योगिक विकासाचे दुसरेही अंग शेतीच्या लेखी महत्त्वाचे ठरते. उद्योग आणि त्यांच्याच बरोबरीने सेवा क्षेत्रांच्या विस्तारामुळे बिगर शेती क्षेत्रातील रोजगाराच्या संधी वाढतात. याचा लाभ शेतीला होतो. शेतीव्यतिरिक्त, अर्थकारणाच्या अन्य अंगोपांगांतील रोजगारसंधी वाढल्याने शेतीवरील मनुष्यबळाचा भार कमी होतो. परिणामी, शेतीमध्ये गुंतलेल्या मनुष्यबळाची उत्पादकता वाढते. त्यातून शेतीचे उत्पादन वाढते. त्याचा लाभ उद्योगांसह एकंदरच अर्थकारणाला मिळतो आणि अर्थविकासाची चाके भिरभिरू लागतात.

शहरांच्या निर्मिती तसेच वाढीची सारी प्रक्रिया या बदलांशी निगडीत अशी असते. स्वत:च्या उदरनिर्वाहासाठी स्वत:पुरते अन्न स्वत:च निर्माण करण्याच्या अनिवार्यतेमधून मुक्त झालेल्यांचा समूह जसजसा वाढू लागतो तसतसे शेतीव्यतिरिक्त

अन्य उद्योगव्यवसायांचे क्षेत्र विस्तार पावू लागते. त्यातून बिगर शेती उद्योगधंद्यांचे विश्व समृध्द होते. नेमक्या याच वास्तवाचा आणि शहरांच्या निर्मितीचा अन्योन्य संबंध आहे. कारण स्वरूपतःच शहरे म्हणजे बिगर शेती उद्योगव्यवसायांची माहेरघरे असतात. बिगर शेती व्यवहारांचा व्याप जसा आणि जिथे वाढत जातो त्या ठिकाणांची प्रकृती हळूहळू पालटू लागते. त्या गावांना वा ठिकाणांना 'शहरा'चे रूप प्राप्त होते. बिगर शेती व्यवसायांचा व्याप जेवढा अधिक आणि जितक्या अधिक ठिकाणी विस्तारतो त्या प्रमाणात नवनवीन ठिकाणांना शहरांचा पेहराव चढत जातो. त्यातूनच वेगवेगळ्या आकाराची-प्रकृतीची शहरे अस्तित्वात येतात, वाढू लागतात. शहरांच्या संख्येत भर पडणे, अस्तित्वात असलेल्या शहरांच्या लोकसंख्येत वाढ होणे, नागरीकरणाची पातळी उंचावणे यालाच आपण 'नागरीकरण' अथवा 'शहरीकरण' असे म्हणतो.

'अर्थविकास' या संकल्पनेत हा सारा कार्यकारणभाव अंतर्भूत आहे. आर्थिक प्रगती ज्या प्रमाणात वेगवान बनते त्यानुसार शहरीकरणाची प्रक्रियाही वेग घेते. या संपूर्ण घडामोडींदरम्यान उपलब्ध जमिनीच्या वापरात मूलभूत बदल होतात. शेतीव्यवसायासाठी जमिनीच्या उपलब्धतेइतकाच तिचा मगदूरही महत्त्वाचा ठरतो. बिगर शेती व्यवसायांचे तसे होत नाही. त्यांच्या लेखी जमिनीची केवळ उपलब्धताच काय ती कळीची ठरते. त्यामुळे, कोणत्याही एखाद्या कारणापायी एखाद्या ठिकाणी उद्योगव्यवहारांचे आणि त्या पाठोपाठच लोकसंख्येचे केंद्रीकरण झाले की त्या ठिकाणास जणू लोहचुंबकाचे स्वरूपच प्राप्त होते. ही ठिकाणे मग उद्योगव्यवसायांचे त्यांच्या ठायी केंद्रीकरण होण्याची प्रवृत्ती उत्तरोत्तर अधिकच बळकट बनवितात. यातूनच वेगवेगळ्या आकारमानांच्या शहरांची जणू एक साखळीच तयार होते.

मुळात एखादे ठिकाण असे लोहचुंबकाप्रमाणे का सक्रिय बनते याची ठिकठिकाणची कारणमीमांसा वेगवेगळी असते. राजधानीचे शहर, लष्करी ठाणे, पर्यटन, स्थळ, तीर्थक्षेत्र, बाजारपेठ, नैसर्गिक साधनसंपत्तीची देणगी अशा नानाविध कारणांमुळे एखाद्या ठिकाणी काही किमान लोकसंख्येचे केंद्रीकरण होण्याच्या प्रवृत्ती स्थिरावलेल्या असतातच. कालांतराने, लोकसंख्या, क्रयशक्ती आणि पर्यायाने मागणी त्या ठिकाणी तयार झाल्याने बिगर शेती उद्योगव्यवसायांचे केंद्रीकरण तिथे होऊ लागते आणि त्या स्थळाची गणना 'शहर' म्हणून केली जाते. काही वेळा स्थानिक प्रशासन अथवा सरकारच एखाद्या ठिकाणी धरणनिर्मितीसारखा एखादा मोठा विकास प्रकल्प प्रवर्तित करते. त्यातून त्या ठिकाणची सरकारी गुंतवणूक वाढते. नाना प्रकारचे रोजगार वाढू लागतात. बांधकामासाठी

आलेल्या मजूर -कर्मचाऱ्यांच्या दैनंदिन गरजा भागविणारे व्यावसायिक आपापले व्यवसाय थाटतात, त्यातून बांधकामे वाढतात....आणि त्या मूळच्या नगण्य गावाचे वा ठिकाणाचे रूपांतर क्रमाने एका मोठ्या नगरात होते. सुरवंटाचे रूपांतर फुलपाखरात व्हावे, असाच हा सारा प्रकार असतो.

वस्तुनिर्मितीप्रधान तसेच सेवाप्रधान उद्योगव्यवसायांचा विस्तार आणि त्यांचे स्थानांकन हा शहरीकरणाच्या प्रक्रियेचा जणू मेरुदंडच. उद्योगांची स्थापना ही एक मोठी विलक्षण बाब आहे. उद्योगांच्या स्थापनेमधून नानाविध वस्तूंच्या उत्पादनक्षमता अस्तित्वात येतात. या उत्पादन क्षमतांचा काही किमान, खरे म्हणजे, पुरेपूर वापर होणे ही उद्योगांच्या किफायतशीरतेची एक आवश्यक बाब गणली जाते. त्यासाठी त्या उद्योगांच्या वस्तूंना काही किमान बाजारपेठ उद्योगांच्या परिसरात विद्यमान असावी लागते. अशा किमान बाजारपेठेची उपलब्धता साहजिकच त्या त्या ठिकाणची लोकसंख्या आणि त्या लोकसंख्येची क्रयशक्ती यांवर अवलंबून राहते. त्यामुळे, उद्योगांच्या स्थापनेसाठी काही किमान लोकसंख्या वा लोकसंख्येचे केंद्रीकरण ही एक अनिवार्य अशी पूर्वअट ठरते. काही किमान लोकसंख्या आणि तिच्या आधाराने परिसरात साकारलेले उद्योग कार्यरत झाले की त्या ठिकाणी पुढील विकासाच्या शक्यतांचे बीजारोपण होते. उद्योगांना पूरक माल, कच्चा माल पुरविणाऱ्या उद्योगव्यवसायांची हळूहळू त्या ठिकाणी उभारणी होते. त्यातून रोजगारसंधींचा विस्तार होतो. स्थलांतरण सुरू होते. परिणामी लोकसंख्या वाढते, क्रयशक्ती वाढते. बाजारपेठ व्यापक बनते. त्यातून उद्योगांच्या स्थापना-विस्ताराचे पुढील पर्व कार्यान्वित होते...आणि याच क्रमाने ते ठिकाण, 'गाव' ते 'महानगर' असा उत्क्रांतीचा एकेक टप्पा पार करीत वाटचाल करीत राहते.

काही किमान लोकसंख्या, लोकसंख्येचे केंद्रीकरण आणि बिगर शेती उद्योगव्यवसायांचे स्थानांकन, बिगर शेती उद्योग व सेवा घटकांचे रोजगारनिर्मितीमधील अग्रगण्य स्थान ही सारी 'शहर' अथवा 'नगर' अशी उपाधी धारण करणाऱ्या ठिकाणांची व्यवच्छेदक लक्षणे. या टप्प्यावर, मग, शेती आणि बिगर शेती क्षेत्रांचे आणि पर्यायाने शहरी व ग्रामीण विभागांचे परस्परसंबंध हा कळीचा विषय ठरतो. आजमितीस निम्मे जग 'शहरी' बनते आहे याचाच अर्थ हा की एकंदरच आर्थिक विकासाची जागतिक प्रक्रिया आणि पर्यायाने 'शहरी' आणि 'ग्रामीण' या उभय विभागांचे अनुबंध एका वेगळ्या पर्वात प्रवेश करीत आहेत. विकासविषयक धोरणांत या स्थित्यंतराचे मूलभूत आणि दूरगामी परिणाम संभवतात.

# चला शहरांकडे ....!

खेड्यापाड्यांतून शहरांकडे (शहरवासी बनण्यासाठी) प्रत्यही येणारे माणसांचे लोंढे हे आपल्या सगळ्यांच्याच नित्याच्या परिचयाचे दृश्य बनले आहे. शहरांच्या वाढविस्तारात या अशा स्थलांतरितांचा हिस्सा मोठा असतो. शहरांची लोकसंख्या दोन मार्गांनी मुख्यतः वाढत असते. एक म्हणजे लोकसंख्यावाढीचा नैसर्गिक दर. तर, शहरांच्या लोकसंख्येत भर पडण्याचा दुसरा स्त्रोत म्हणजे स्थलांतरण. या दोन स्त्रोतांचे परस्पर तौलनिक महत्त्व स्थलकालपरत्वे कमी-अधिक होत असते. इथून पुढच्या काळात, म्हणजे, नागरीकरणाच्या दुसऱ्या लाटेदरम्यान शहरांची लोकसंख्या ही मुख्यत्त्वे लोकसंख्यावाढीच्या नैसर्गिक प्रक्रियेद्वारेच वाढेल, असा अभ्यासकांचा दावा आहे.

'स्थलांतरण' हा शब्द उच्चारला की आपल्या डोळ्यासमोर उभे राहते ते ग्रामीण भागांतून शहरांकडे होणारे स्थलांतरण. याचे कारणही तसेच स्वाभाविक आहे. शहरांवरील लोकसंख्येचा भार वाढण्यास हे ग्रामीण भागांतून आलेले स्थलांतरितच कारणभूत आहेत, असा आपला पक्का समज असतो. मात्र, हे पूर्णांशाने खरे नाही. अलीकडील काळात शहरांकडून शहरांकडे होणारे स्थलांतरणही काही विशिष्ट प्रकृतिधर्माच्या शहरांची झपाट्याने वाढ होण्यास हातभार लावत असल्याचे अनुभवास येते. लहान शहरांकडून महानगरांकडे केले जाणारे स्थलांतरण, असे याचे स्वरूप असते. ग्रामीण भागांतून शहरांकडे धाव घेणारे स्थलांतरित आणि एका शहरातून दुसऱ्या शहरात स्थलांतरण करणारे स्थलांतरित यांचे 'प्रोफाइल' वय, शिक्षण, क्षमता, स्थलांतरणाचा हेतू अशा नानाविध बाबतींत परस्परांपेक्षा लक्षणीयरित्या भिन्न असते. आपल्या गावातून उठून शहराकडे प्रथमच स्थलांतर करणारा स्थलांतरित बहुशः रोजीरोटीच्या शोधार्थ बाहेर पडलेला असतो. तर, लहान शहरातून मोठ्या नगराकडे सरकणारा स्थलांतरित हा बव्हंशी 'अधिक चांगल्या रोजगार संधी'च्या वाटा चोखाळण्यासाठी मार्गस्थ झालेला असतो. तांत्रिक परिभाषेत यास 'स्टेप मायग्रेशन' असे म्हणतात. आपल्या खेड्यातून प्रथम जवळच्या लहान शहरात जायचे. श्रमांच्या शहरी बाजारपेठेत शिरकाव करून तिथे ठाण मांडण्यासाठी आवश्यक असणारी कौशल्ये हस्तगत करावयाची आणि मग

या पुंजीसह, योग्य संधी मिळताच महानगराकडे धाव घ्यायची असा हा क्रम असतो. शहरीकरणाच्या आता येऊ घातलेल्या दुसऱ्या लाटेदरम्यान ही प्रक्रिया व ही प्रवृत्ती अधिकच जोमदार बनेल, अशी लक्षणे आहेत. दळणवळण तसेच प्रवास व वाहतुकीच्या यंत्रतंत्रात आणि साधनांत प्रचंड प्रगती झाल्याने हे स्थलांतरण अधिकच सुकर बनले आहे. परिणामी, नित्याने शहरांच्या वाटेने धावणाऱ्या या स्थलांतरितांना सामावून घेत असतानाच शहरांतर्गत पायाभूत सेवासुविधांची कार्यक्षमता कशी टिकवून धरावी, या विवंचनेत जगभरातीलच नगरनियोजनकार आणि नगरप्रशासक आज पडलेले दिसतात. या आव्हानाला या प्रशासकांकडून दिला जाणारा प्रतिसाद मात्र विपरीतच असल्याचे ठिकठिकाणी दिसते. स्थलांतरण आणि त्याची सातत्यशीलता हे एक अनिवार्य असेच वास्तव आहे, याची पुरेशी संवेदनशील जाण न बाळगताच ते रोखण्याचे प्रयत्न मोठ्या जारीने केले जातात. हे प्रयत्न मग विफल ठरतात, हे वेगळे सांगण्याची गरज नाही.

लॅटिन अमेरिका, पश्चिम आशियाई अरब राष्ट्रे, कॅरेबियन बेटे .... सर्वत्रच हा अनुभव येतो. रोजगाराचा शोध हे स्थलांतरणाचे एक सर्वसाधारण, सार्वत्रिक आणि सार्वकालिक कारण असले तरी स्थलांतरणामागील प्रेरणा या देशकालपरिस्थितीनुरूप वेगवेगळ्या असल्याचे दिसते. आफ्रिकेच्या सहारा परिसरात घडून आलेले वा येत असलेले स्थलांतरण या वास्तवाचा एक नमुना ठरावे. विविध भागांत सतत जाणवणारी अन्नधान्याची टंचाई, जणू पाचवीलाच पुजलेला दुष्काळ, वांशिक दंगली, यादवी, कुठे ना कुठे वारंवार उसळणाऱ्या लढाया यांनी पीडीत असलेले स्थलांतरितांचे तांडेच्या तांडे शहरांकडे वाहत असतात. या लोंढ्यांना सामावून घेताना शहरांच्या क्षमता पार खर्ची पडल्या आहेत. परिणामी, पायाभूत सेवासुविधांचा पुरवठा, उपलब्धता, गुणवत्ता आणि त्यांच्या आधारे निश्चित होणारा शहरी जीवनमानाचा दर्जा यांत 'ग्रामीण' आणि 'शहरी' असा फरक फारसा करताच येत नाही.

लोकसंख्येच्या वाढत्या ताणापायी शहरांतर्गत पायाभूत सेवासुविधांच्या पुरवठ्यावर गदा येणे, हे एक नित्याचेच शहरी वास्तव बनले आहे. यात सगळ्यात भीषण परिस्थिती आहे ती राहत्या जागेच्या टंचाईसंदर्भात. स्थलांतरितांचे प्रमाण जसे वाढते तसतशी निवासी गाळ्यांसाठी येणारी मागणी वाढत जाते. साहजिकच, घरबांधणीसाठी जमिनीचा पुरवठा करण्याची निकड निर्माण होते. शहरांतर्गत जमिनीची मर्यादित उपलब्धता ध्यानात घेता या अशा गाळ्यांची मागणी भागविण्यासाठी जमिनीचा पुरवठा व्हावा या दृष्टीने जमीनविषयक संबंधित धोरणे व कायदेकानू यांत अनुरूप

बदल करण्याची आवश्यकता भासते. मात्र, शहरांची वाढ आणि स्थलांतरितांचा त्यातील सहभाग यांच्या अपरिहार्यतेची सुयोग्य जाण नसलेले धोरणकर्ते या बदलांना बगल देऊन शहरांतर्गत जमिनीच्या बाजारपेठेतील मागणी व पुरवठ्याचे संतुलन राहावे या दिशेने योग्य पावले वेळेवर उचलत नाहीत, असा या क्षेत्रातील जाणकारांचा आक्षेप आहे. त्यामुळे होते इतकेच की बाहेरून येऊन शहरांत निवासासाठी जागा शोधणाऱ्या निम्न उत्पन्न गटांतील स्थलांतरितांसह एकंदरच अक्षम समाजसमूहांच्या निवासी गाळ्यांचा प्रश्न बिकट बनतो. मग, नगरा-महानगरांमध्ये फोफावणाऱ्या झोपडवस्त्या या नेमक्या याच कार्यकारणभावाची अपरिहार्य अशी अपत्ये ठरतात.

हे काहीही असले तरी, स्थलांतरणाद्वारे शहरांत आलेल्या स्थलांतरितांच्या जीवनमानाचा दर्जा उंचावतो, हाच जगभरातील अनुभव आहे. शहरांमधील दैनंदिन जीवन हे कितीही निकृष्ट असले तरी आपल्या खेड्याच्या तुलनेत ते खूपच 'बरे' आहे, अशीच स्थलांतरितांची भावना असल्याचा सार्वत्रिक दाखला आहे. भले आज शहरांत आपल्याला निम्न रोजगार मिळाला असेल, आज एक वेळ आपल्याला चांगले घर राहावयास नसेल परंतु, निदान उद्या यापेक्षा चांगला रोजगार आणि निवारा मिळण्याच्या शक्यता शहरी वास्तव्यातच उमलू शकतात, याबाबत स्थलांतरित आशावादी असतात. ग्रामीण भागांतील आपले जिणे हे गोठलेले होते तर, विकासाच्या संधींची दारे ही शहरांतच खुली होतील अशी धारणा सार्वकालिक दिसते. विशेषतः, भारतासारख्या उतरंडप्रधान समाजात तर शहरांमधील एक प्रकारचे 'फेसलेस' जगणे विशिष्ट सुरक्षितता पुरविते. जातपात, धर्म, वंश, वेष, भाषा, वर्ण, प्रांत यांवर आधारित भेदाभेदाचे काच अंमळ कमी बोचतात. केवळ इतकेच नाही तर, पदरी येणारी उपेक्षा, अन्याय, पायाभूत सेवासुविधांच्या पुरवठ्याबाबत अनुभवास येणारी वंचना यातून निर्माण होणारा असंतोष शहरांमध्ये अधिक संघटितपणे, एकात्म प्रकारे व्यक्त करता येतो. अशा संघटित रूपाने उफाळलेल्या असंतोषाची माध्यमांपासून राज्यकर्त्यांपर्यंत सारेच संबंधित लगोलग दखल घेतात. त्यामुळे समस्या तडकाफडकी निवारण जरी झाली नाही तरी तिचा निचरा होण्याच्या शक्यता निदान अंकुरतात तरी.... शहरांकडे धाव घेण्यामागे सक्रिय असणाऱ्या स्थलांतरिताच्या प्रेरणा या अशा बहुआयामी असतात.

स्थलांतरणाच्या हातळणीबरोबरच एकंदरच नागरीकरणाचा विस्तार आणि शहरी लोकसंख्या वाढ या उभय बाबींप्रती असणारा प्रशासक तसेच नगरनियोजनकारांचा प्रतिसाद शहरीकरणाची दुसरी लाट येऊ घातलेली असताना कळीचा ठरतो. या

संदर्भात, विशेषतः, भारत आणि चीन या दोन शेजारी आणि महाकाय देशांमधील धोरणकर्त्यांचा प्रतिसाद तर अधिकच संवेदनशील ठरणार आहे. कारण, उभ्या जगातील थोडेथोडकी नाही तर चांगली ३७ टक्के लोकसंख्या याच दोन देशांमध्ये सामावलेली आहे. भारतातील वास्तवाचा विचार केला तर असे दिसते की नागरीकरणाची सरासरी पातळी तशी विशेष नसूनही मोठ्या शहरांना भेडसावणाऱ्या समस्या चांगल्याच भीषण आहेत. शहरांच्या लोकसंख्या वाढीत नैसर्गिक वाढीचा सहभाग अलीकडील काळात स्थलांतरणापेक्षा अधिक बनला आहे. शहरांतर्गत संघटित क्षेत्रातील रोजगाराच्या संधींची वाढ गोठलेली असल्याने रोजीरोटीच्या शोधार्थ शहरांकडे वळणाऱ्या स्थलांतरितांना नगरा-महानगरांमधील असंघटित क्षेत्रात उपजीविका शोधण्याखेरीज अन्य पर्यायच उरत नाही. असंघटित क्षेत्रात रोजगार उपलब्ध होत असल्याने स्थलांतरितांचा ओघही आटत नाही. परिणामी, शहरी गरिबीचे प्रमाण वाढतेच आहे. त्यातही पुन्हा लक्षणीय बाब ही की, मोठ्या व मध्यम आकारमानाच्या शहरांपेक्षाही लहान शहरांत गरिबीचे प्रमाण अधिक असल्याचे संबधित आकडेवारी दर्शविते.

भारतातील शहरी लोकसंख्येच्या वाढीत, अलीकडील काळात, नैसर्गिक प्रक्रियेचा सहभाग हा स्थलांतरणापेक्षा तुलनेने अधिक राहिलेला असला तरी स्थलांतरणामुळे शहरी लोकसंख्येत पडणारी भर अगदीच नगण्य आहे, असे मात्र समजण्याचे कारण नाही. स्थलांतरणामुळे शहरी पायाभूत सेवांसुविधांवर पडणारा ताण ध्यानात घेऊन स्थलांतरणास आळा घालण्याच्या हेतूने सरकारने राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेची अंमलबजावणी गेल्या दोन वर्षांपासून सुरू केली आहे. या उपक्रमामुळे स्थलांतरणास कितपत पायबंद बसतो, हे अभ्यासांती कळेलच. मात्र, सातत्यशील असणाऱ्या स्थलांतरणामुळे लोकसंख्येचा अतिरिक्त भार पडून शहरांतर्गत सुविधांचे कंबरडे मोडले आहे, याचे पुरावे प्रत्यही नजरेसमोर येतात. त्यातही, तुलनेने अधिक गंभीर आहे तो प्रश्न नागरी निवाऱ्याचा.

चीनचे चित्र भारतापेक्षा बरेच निराळे आहे. एक तर, १९४९ ते १९७८ या काळात शहरी लोकसंख्या वाढ पूर्णतः नियंत्रणाखाली होती. ग्रामीण भागांतून शहराकडे होणाऱ्या स्थलांतरणावर तिथे कडक निर्बंध जारी करण्यात आले होते. १९७०च्या दशकाखेरीस आर्थिक सुधारणांचे वारे वाहू लागले आणि स्थलांतरणावरील चिनी बंधने बरीचशी सैलावली. किनारपट्टीवरील ज्या शहरांमध्ये विशेष आर्थिक क्षेत्रांची उभारणी करण्यात आली होती त्या शहरांकडे स्थलांतरणास मुभा देण्यात आली.

आजमितीस चीन जवळपास उभ्या जगाचेच उत्पादन केंद्र बनला आहे. निदान वस्तुनिर्माण उद्योगांचे तेथील केंद्रीकरण, बहुराष्ट्रीय कंपन्यांनी तिथे थाटलेली कार्यालये व स्थापन केलेल्या उत्पादन सुविधा आणि आंतरराष्ट्रीय भांडवल तसेच गुंतवणुकीचा चीनकडे वाहणारा प्रवाह तरी या बाबीची ग्वाही देतो. चीनमधील हे बहुतेक कारखाने तेथील मोठ्या शहरांच्या परिसरातच आहेत. लहान-मोठ्या आकाराची जवळपास ६६० शहरे आजमितीस चीनमध्ये आहेत. येत्या दशकभराच्या आतच चीनच्या एकूण लोकसंख्येपैकी जवळपास निम्म्याहून अधिक लोकसंख्या (अदमासे ८७ कोटी) शहरवासी बनलेली असेल. या सगळ्या नागरी स्थित्यंतरात स्थलांतरणाची भूमिका महत्त्वाची आणि संख्यात्मकदृष्ट्या कळीची राहील, असा अभ्यासकांचा होरा आहे. याला कारणेही तशी सबळच आहेत. लोकसंख्या नियंत्रणाचे धोरण आजवर पोलादी शिस्तीने राबविल्याने चीनमधील जनन दर घटलेलाच आहे. त्यातच, शिक्षणाचा खर्च अलीकडील वर्षांत लक्षणीयरीत्या वाढलेला आहे. त्याच वेळी, उदारीकरणाच्या गेल्या जवळपास तीन दशकांदरम्यान चाखावयास मिळालेल्या सुबत्तेपायी चिनी शहरवासियांच्या अपेक्षांचा आलेखही चांगलाच उंचावलेला आहे. अशा वातावरणात, शहरी लोकसंख्येत पडणारी भर ही मुख्यतः स्थलांतरणामुळेच पडावी, हे तर्कशुद्ध ठरते. एका अंदाजानुसार, आगामी काळात दरवर्षी सुमारे १ कोटी ८० लाख ग्रामीण चिनी नागरिक शहरांकडे स्थलांतर करतील. या स्थलांतरितांना सामावून घेत असतानाचा शहरांची कार्यक्षमताही टिकवून धरणे, हे चिनी नगरनियोजनकारांसमोरील एक मोठे आव्हानच ठरणार आहे.

## स्थलांतरण आणि गरिबी

शहरी लोकसंख्यावाढीचे नियंत्रण करण्यासाठी स्थलांतरणास पायबंद घालण्याचे प्रयत्न जगात ठिकठिकाणी जारीने होऊनही ते आजवर विफलच ठरल्याचा दाखला मिळतो. एकंदरच जगभरातील नागरीकरणाची पातळी ज्या प्रमाणात उंचावेल त्या प्रमाणात ग्रामीण भागांकडून शहरांकडे होणाऱ्या स्थलांतरणात घट व्हावी, हे तर्काला धरूनच आहे. तरीसुद्धा, जगभरातील नागरी लोकसंख्येत पडणाऱ्या भरीचा अभ्यास केला तर असे लक्षात येते की, शहरांच्या लोकसंख्येत होणाऱ्या वाढीपैकी सरासरी ४० टक्के वाढ ही स्थलांतरितांमुळे घडून येते. एकीकडे हे वास्तव डोळ्यासमोर सातत्याने दिसत असूनही सर्वसाधारणपणे नगरविकास तसेच नगरनियोजनाच्या धोरणांचा गाभा हा आजही स्थलांतरण रोखण्यावरच केंद्रित झालेला दिसतो. कारण, ग्रामीण भागांकडून शहरांकडे होणारे स्थलांतरण, त्यापायी शहरी पायाभूत सुविधांवर पडणारा ताण, शहरांत

फोफावणारे असंघटित क्षेत्र, त्यामुळे सातत्यशील बनणारी शहरी गरिबी यांचा एकमात्र आणि एकदिशी असा सरळ संबंधच काय तो धोरणकर्त्यांनी गृहीत धरलेला असतो.

शहरांतर्गत असंघटित क्षेत्रात रोजीरोटी शोधणारे आणि शहरांत मिळेल तेथे निवारा थाटणारे हे स्थलांतरित स्थानिक स्वराज्य संस्थेच्या तिजोरीत कररूपाने कोणतेही योगदान देत नाहीत; उलट, त्याच नगर संस्थेने पुरविलेल्या सार्वजनिक सुविधांवर हे हक्क मात्र सांगतात, ही भूमिका वारंवार मांडली जाते. जेवढ्या नगरवासियांकडून कररूपाने निधी गोळा केला जातो त्यापेक्षा किती तरी अधिक हक्कदारांना सेवा पुरवाव्या लागत असल्यानेच शहरी सेवांच्या पुरेशा देखभाल-दुरुस्तीसाठी स्थानिक स्वराज्य संस्थांकडे पैसा उरत नाही आणि त्यामुळे या सेवांचा दर्जा खालावून अंती एकंदरच शहरी जीवनमानाची गुणवत्ता ढासळते, असेही विवेचन या संदर्भात केले जाते. स्थलांतरितांचा शहरांकडे वाहणारा ओघ, त्यापायी वाढणारी शहरी गरिबी आणि शहरी पायाभूत सुविधांवरील वाढणारा ताण यांचा परस्परसंबंध पुन्हा एकवार नीट न्याहाळण्याची गरज आहे. या संदर्भात केल्या जाणाऱ्या प्रतिवादानुसार या सगळ्या बाबी खऱ्या असल्या तरी त्यांची सत्यता ही निरपवाद नाही. या साऱ्या बाबी वास्तव आहेत, मात्र केवळ अंशतःच.

ग्रामीण भागांतून शहरांमध्ये येणाऱ्या स्थलांतरितांमुळे शहरी गरिबीची समस्या अधिक उग्र बनते, अशी एक भूमिका वारंवार मांडली जाते. मात्र, हे प्रमेय तसेच्या तसे मान्य करावे, इतपत वस्तुस्थितीचा निरपवाद पाठिंबा त्यास मिळत नाही. एकतर, शहरांमधील अतिरिक्त लोकसंख्या वाढ हे शहरी गरिबीचे एक मुख्य कारण म्हणून गणले जात असेल तर, अनेक देशांमधील शहरांची लोकसंख्या अलीकडे स्थलांतरणापेक्षाही लोकसंख्या वाढीच्या नैसर्गिक दरापायीच वाढत असल्याचे अनुभवास येते, ही बाब नजरेआड करता येणार नाही. दुसरे म्हणजे, शहरांमध्ये वास करणारे आणि गरिबीचे जिणे कंठणारे सारेच काही स्थलांतरित नसतात. त्याचप्रमाणे, केवळ स्थलांतरितांमध्येच गरिबीचे प्रमाण प्रामुख्याने अधिक आढळून येते, अशीही आकडेवारी कोठे सापडत नाही. स्थलांतरणावर थेट निर्बंध जारी केल्याने शहरी दारिद्र्याचे निराकरण सुकर होते, असाही दाखला सापडत नाही. उलटपक्षी, खेड्यांकडून शहरांकडे होणाऱ्या स्थलांतरणास अटकाव केला तर केवळ शहरीच नव्हे तर, ग्रामीण भागांतील गरिबीची समस्याही अधिक सघन बनते, असे काही अभ्यासकांचे निरीक्षण सांगते. त्यामुळे, शहरी गरिबी आणि स्थलांतरण यांचा निव्वळ एकदिशी संबंध गृहीत धरणे उचित नाही.

शहरी भागांतील गरिबीचे निवारण करण्यावरच भर दिल्याने ग्रामीण विकासाच्या प्रक्रियेकडे दुर्लक्ष होईल, असा एक आक्षेप घेतला जातो. मात्र, त्यातही तथ्यांश नाही. मुळात, दारिद्र्याच्या समस्येचा 'शहरी दारिद्र्य' आणि 'ग्रामीण दारिद्र्य' असा पृथक विचार करणेच अपर्याप्त (आणि त्याही पुढे जाऊन बोलावयाचे तर चुकीचे) आहे, असे प्रतिपादन आता अनेक अभ्यासक करीत आहेत. गरिबी निवारणाचा विचार हा एकात्मरीत्याच होणे गरजेचे आहे. दुसरे म्हणजे, शहरांतील गरिबी आणि ग्रामीण भागांतील गरिबी ही बरेच वेळा परस्परपोषकच असते. तिसरे म्हणजे, ग्रामीण भागांतील गरिबीचे उच्चाटण झाल्यामुळे शहरांकडे होणारे स्थलांतरण हे निःसंशय खुंटेलच असे छातीठोकपणे कोणीही सांगू शकणार नाही. कारण, ग्रामीण भागांतील गरिबीचे निवारण झालेच तर शहरांकडे होणाऱ्या स्थलांतरणावर त्याचा दुहेरी परिणाम संभवतो. एक शक्यता अशी की दारिद्र्याच्या गर्तेतून बाहेर आलेल्या ग्रामीण जनसमूहांच्या अपेक्षांची कमान साहजिकपणेच उंचावलेली असल्याने अधिक चांगल्या वा सुधारित जीवनमानाच्या अपेक्षेने असे जनसमूह उलट शहरांकडेच आपली पावले वळवतील. या परिस्थितीत, ग्रामीण भागांतील गरिबी निवारणामुळे शहरांकडे होणाऱ्या स्थलांतरणात घट होण्याऐवजी त्यात वाढच होईल. दुसरी शक्यता म्हणजे ग्रामीण भागांतच उत्पादक स्वरूपाचे रोजगार उपलब्ध झाल्याने तेथील गरिबीत घट होऊन रोजीरोटीच्या शोधार्थ शहरांकडे धाव घेणाऱ्यांचे प्रमाण उणावेल आणि शहरांकडे होणाऱ्या स्थलांतरणास अपेक्षित पायबंद घातला जाईल. परंतु, शहरी तसेच ग्रामीण भागांमधील संबंध अधिक उत्पादक स्वरूपाचे, निकोप आणि परस्परपोषक असे बनले तर उभय ठिकाणच्या गरिबीचे निवारण त्यामुळे परिणामकारकरीत्या शक्य होईल, याबाबत आता धोरणकर्त्यांप्रमाणेच संशोधकांचेही मतैक्य होताना दिसते.

स्थलांतरितांचे लोंढे सातत्याने शहरांकडे वाहत राहिल्यामुळेच सर्व मोठ्या शहरांमध्ये झोपडपट्ट्यांचे पेव फुटलेले दिसते, असे सततच सांगितले जाते. परंतु, हा प्रश्न मुख्यतः शहरी जमिनींच्या बाजारपेठेचे कार्यक्षम व्यवस्थापन करण्याशी संलग्न आहे, अशी भूमिका आताशा मांडली जाते. शहरांतर्गत उपलब्ध जमिनीचा वापर, त्यांत होणारे बदल, जमिनीचा पुरवठा, हा पुरवठा निर्धारित करणारे कायदेकानू, नियम व त्या संदर्भातील धोरणे, अल्प उत्पन्न गटांतील समाजसमूहांसाठी घरबांधणीचे सुयोग्य धोरण, त्या धोरणाची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्याबाबत संबंधितांची बांधिलकी आणि इच्छाशक्ती अशा अनेकानेक घटकांशी झोपडपट्ट्यांचा प्रश्न जोडलेला आहे.

## स्थलांतरित व रोजगार

ग्रामीण भागांतून वा अन्य ठिकाणांहून शहरांमध्ये येणारे स्थलांतरित हे शहरांमधील उपलब्ध पायाभूत सेवासुविधा तसेच शहरांतर्गत साधनसामग्रीवर बोजा टाकतात (ड्रेन ऑन रिसोर्सेस्) असा दावा केला जातो. मात्र, अलीकडच्या संशोधनाने या दाव्यातील कच्चे दुवेही समोर आणले आहेत. शहरांमध्ये येणारे स्थलांतरित हे बहुशः शहरांमधील संघटित रोजगाराच्या आशेने येत असतात. पण श्रमांच्या संघटित बाजारपेठेत प्रवेश न मिळाल्याने त्यांना शहरांमधील असंघटित क्षेत्रात उपजीविकेचा पर्याय शोधावा लागतो. हे असे असंघटित क्षेत्र म्हणजे जणू काही शहरी अर्थव्यवस्थेच्या आणि विशेषतः शहरी संघटित क्षेत्राच्या जीवावर फोफावणारे बांडगूळच आहे, अशा प्रकारचा दृष्टिकोण आता आतापर्यंत प्रचलित होता व आजही काही प्रमाणात आहे. परंतु, विकसनशील देशांमधील जवळपास सर्वच मोठ्या शहरांमधून अस्ताव्यस्त विस्तारलेल्या या असंघटित क्षेत्राचे केवळ त्या शहर वा देशातीलच नव्हे तर, जागतिक संघटित उद्योग-उत्पादन क्षेत्राशी उत्पादक स्वरूपाचे संबंध प्रस्थापित झाले असल्याचे दाखले आताशा मिळत आहेत. याचाच अर्थ हा की, शहरांमधील असंघटित उद्योग-व्यवसाय क्षेत्र हा आता शहरी अर्थकारणाचा एक स्वायत्त घटक बनला असून त्याचे 'बांडगूळ' पण आता लोपते आहे.

केवळ शहराच्याच नव्हे तर वैश्विक अर्थकारणात महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या संघटित उद्योग-व्यवसाय क्षेत्राशी उत्पादक स्वरूपाचे संबंध प्रस्थापित झालेले असल्याने संघटित उद्योग क्षेत्राची बाजारपेठीय स्पर्धात्मकता आणि पर्यायाने किफायतशीरता वाढविण्यात या असंघटित क्षेत्राचे मोठेच योगदान आहे. त्यामुळे या उभय क्षेत्रांची वाढ परस्परपूरक पद्धतीने होताना दिसते. त्यातही पुन्हा तुलनेने अधिक महत्त्वाचे म्हणजे, हे असंघटित क्षेत्र हा शहरी रोजगाराचा एक मोठाच पुरवठादार गणला जातो. आफ्रिकेच्या सहारा परिसरातील शहरांमध्ये तर या असंघटित क्षेत्राचा रोजगारनिर्मितीमध्ये सिंहाचा वाटा असल्याचे दिसते. असंघटित क्षेत्रात निर्माण होणाऱ्या रोजगार संधींचा हिस्सा या भागातील शहरांमधील एकूण रोजगारात जवळपास दोन तृतीयांशांपेक्षा अधिक आहे. त्यातल्या त्यातही पुन्हा शहरांमधील अकुशल, अर्धकुशल होतकरू मुली तसेच स्त्री कामगारांना रोजगाराच्या दृष्टीने याच असंघटित क्षेत्राचा मोठा आधार वाटतो.

स्थलांतरणामुळे शहरांवरील ताणांत असह्य वाढ होते, अशी भूमिका घेत ग्रामीण भागांकडून शहरांकडे होणाऱ्या स्थलांतरणावर येनकेनप्रकारेण थेट निर्बंध जारी

करण्याचे प्रयत्न आजवर जगभरात कोठेही यशस्वी झालेले नाहीत. जे काही प्रयत्न जेथे कोठे झाले त्यांची फलनिष्पत्ती विचारावी तर ती चक्क शून्य आहे. वाढत्या लोकसंख्येचा भार सहन करण्याची शहरांची क्षमता वर्धिष्णू ठेवण्यासाठी शहरांमधील पायाभूत सेवासुविधांचे भरणपोषण अत्यावश्यक ठरते. त्यासाठी शहरांमध्ये जी सार्वजनिक गुंतवणूक केली जाते तिचाच हात धरून खासगी गुंतवणूकही शहरांमध्ये प्रवेशते. या गुंतवणूकीच्या हातात हात घालून नवनवीन रोजगार संधी नगर-महानगरांमध्ये तयार होतात. या रोजगारांकडे आकर्षित होऊन स्थलांतरितांचा प्रवाह पुन्हा शहरांकडेच वाहू लागतो. हे एक जणू चक्रच मग कार्यरत बनते. वाढत्या लोकसंख्येचा शहरांवरील असह्य ताण सुसह्य बनविण्यासाठी शहरांमधील पायाभूत सेवासुविधांचे सबलीकरण करणे अनिवार्य होऊन बसते. त्यासाठी प्रशासन जे काही उपक्रम हाती घेते त्यांद्वारे पुन्हा गुंतवणूक, रोजगार आणि लोकसंख्या यांचे केंद्रीकरण शहरांमध्येच होण्याच्या प्रवृत्तीला जोर येतो. यातून स्थलांतरणाच्या ऊर्मींना धुमारे फुटतात.

हे चक्र छेदण्यासाठी, शहरांमधील सेवासुविधांच्या सुधारणा-सबलीकरणाकडे पूर्णपणे दुर्लक्षच करावयाचे अशीही एक टोकाची धोरणप्रणाली कधीमधी सुचविली जाते. एकदा का शहरी सेवांचा दर्जा कमालीचा खालावला की आपोआपच शहरी जीवनमानाची गुणवत्ताही ढासळेल. शहरी जीवनाचा पोतच निकृष्ट बनला की साहजिकच शहरी जीवनाबाबतच्या आकर्षणाला ओहोटी लागेल. शहरांमधील जीवन आणि ग्रामीण भागांतील हलाखीचे जीवन यांतील फरकाची दरी ज्याप्रमाणात निरुंद बनेल त्या प्रमाणात ग्रामीण भागांतून उठून शहरांकडे धाव घेण्याच्या वृत्ती-प्रवृत्तींना आळा बसेल, असा तर्क या भूमिकेमागे आहे. या तर्कशास्त्राचा प्रतिवाद करणारे अभ्यासक या चित्राची दुसरी बाजू समोर आणतात. या प्रतिवादानुसार, शहरी पायाभूत सेवासुविधांची पूर्ण उपेक्षा करण्याने, शहरांच्या सुधारणेसाठी सार्वजनिक गुंतवणूकीचे ‘इंजेक्शन’च न देण्याने, उलट, शहरी गरिबीचे कायमीकरण होण्यास हातभारच लागेल. कोणत्याही कारणाने का होईना, पण, शहरांमध्ये जी गुंतवणूक होते तिच्या माध्यमातून शहरांतील असंघटित क्षेत्र फोफावते, हे कोणी नाकारणार नाही. मात्र, या असंघटित क्षेत्रात सामावल्या जाणाऱ्यांना आज ना उद्या शहरांतील संघटित क्षेत्रात रोजगार मिळण्याच्या शक्यता या सैद्धांतिक पातळीवर तरी खुल्या असतातच. शहरांमधील गुंतवणूकच खुंटली तर शहरांमधील संघटित क्षेत्राच्या वाढविस्तार क्षमतांवर त्याचा प्रतिकूल परिणाम होऊन परिणामी असंघटित क्षेत्रातील कष्टकऱ्यांना संघटित क्षेत्रात रोजगार

उपलब्ध होण्याच्या (आधीच क्षीण असणाऱ्या) शक्यता पारच कोमेजून जातील. काही समाजसमूहांच्या लेखी असणारी स्थलांतरणाची अपरिहार्यता दृष्टिआड केल्यामुळेच या प्रकारच्या टोकाच्या भूमिका मांडल्या जातात, असेही प्रतिपादन अनेक अभ्यासकांनी केलेले आहे. ग्रामीण भागांतील भूमिहीन शेतमजूर, अल्प व अत्यल्प भूधारक, कोरडवाहू शेतकरी असे काही समूह या संदर्भात चटकन नजरेसमोर येतात. उद्योग-व्यवसायांचा विस्तार प्रामुख्याने शहरांच्या परिसरातच होत असल्याने ग्रामीण भागांतील बिगर शेती रोजगाराच्या संधी खुंटलेल्या-खुरटलेल्या आहेत. साहजिकच उपजीविकेसाठी तसेच रोजगारासाठी शेतीवर निर्भर असलेल्या मनुष्यबळाचा भार अतिरिक्त बनतो आहे. कुटुंबांतील वाटपापायी होणारे पिकाऊ जमिनीचे तुकडे, त्यामुळे अ-किफायतशीर ठरणारा शेतीउद्योग, शेतीमधील ठप्प झालेली गुंतवणूक, जमिनीचा उतरणारा कस, त्यापायी घटणारी उत्पादकता, परिणामी घसरणारे उत्पन्न या चक्रात सापडलेले शेतीव्यावसायिक अतिशय स्वाभाविकपणेच स्थलांतरणाचा पर्याय चोखाळून शहरांमध्ये येतात. मोठ्या प्रमाणावर होणारी जंगलतोड, चराऊ कुरणांची घटती मात्रा यांमुळे जंगले व वनसंपत्ती तसेच पशुपालनाच्या आधारे उपजीविका करणाऱ्या समाजसमूहांची उदरनिर्वाहाची साधनेच नष्ट होऊ लागल्याने त्यांनाही जगण्यासाठी शहरांच्या पंथाला लागण्यावाचून गत्यंतर उरलेले नाही. पर्यायी रोजगाराच्या शोधार्थ शहरांचे दरवाजे ठोठावणाऱ्यांप्रमाणेच वांशिक दंगली, यादवी यांसारख्या सामाजिक उद्रेकांपायी जीवन असुरक्षित बनलेले समाजघटक सामाजिक सुरक्षेची ढाल शोधत शहरांकडे येतात.

या सगळ्या वास्तवाचा वेध घेता, शहरांकडे होणाऱ्या स्थलांतरणावर थेट निर्बंध जारी करण्याचे सारे उपाय, सारी धोरणे सपशेल निकामी का ठरतात याची कल्पना येते. स्थलांतरण रोखण्याचा प्रयत्न करण्याने ग्रामीण हलाखीत भरच पडेल, असाही अनेक अभ्यासकांचा सांगावा आहे. कारण, स्थलांतरण करून उपजीविकेसाठी शहरांमध्ये आलेले कुटुंबसदस्य आपल्या मूळ गावी असलेल्या अन्य कुटुंबसदस्यांसाठी शहरांतून जो पैसा पाठवितात तो पैसा केवळ त्या कुटुंबाचाच नाही तर एकंदरच ग्रामीण अर्थकारणाचा एक भक्कम टेकू ठरतो. त्यामुळे, शहरी लोकसंख्यावाढ आणि वाढते शहरी दारिद्र्य यांचा मुकाबला करण्यासाठी स्थलांतरणास अटकाव करण्याचे धोरण राबविले तरी शहरी गरिबी दूर होईल याची हमी नाहीच, उलट, ग्रामीण भागांतील गरिबीची समस्या अधिक गंभीर बनण्याचा अनवस्था प्रसंग ओढवेल. जणू आगीतून निघून फुफाट्यात पडल्यासारखीच अवस्था !

✿✿

# शहरांचा विस्तार आणि आकार

शहरांची वाढ, नागरीकरणाचा विस्तार, शहरी लोकसंख्येत पडणारी भर ही अवघी एका प्रकारे जागेसाठी करावी लागणारी लढाईच असते. शहरांच्या संख्येत भर पडते, शहरांच्या भौगोलिक सीमांचा विस्तार होतो त्या वेळी साहजिकच जमिनीचा वापरही बदलत असतो. शहरांच्या परिघांवरील भूक्षेत्र ज्या वेळी शहरांच्या पोटात सामावून घेतले जाते त्या वेळी एका प्रकारे परिसरातील ग्रामीण वा अर्धनागरी क्षेत्राकडून जमिनीचे केले जाणारे ते हस्तांतरणच असते. स्वखुषीने केलेले वा निरुपायाने पदरी आलेले ! म्हणजेच, ही असते स्पर्धा ....उपलब्ध जागेसाठीची स्पर्धा. ही स्पर्धा, ही लढाई अंमळ वेगळ्या स्वरूपात लढली जाते ती शहरांतर्गत भूवापराचा संदर्भ येतो तेव्हा. इथे प्रश्न असतो तो शहरातील उपलब्ध मोजक्या जागेचा आणि तिच्या बहुपर्यायी उपयोगाचा, तिच्यावर हक्क सांगणाऱ्या विविध हक्कदारांच्या दाव्यांचा. शहरीकरणाची येऊ घातलेली जी दुसरी लाट आहे त्या लाटेदरम्यान भूवापराबाबतची ही झंगडफक्कड अधिकच तीव्र होण्याची शक्यता आहे. कारण, या लाटेदरम्यान ज्या प्रमाणे शहरी लोकसंख्येचे आकारमान वाढणार आहे त्याचप्रमाणे शहरांनी व्यापलेल्या, शहरांतर्गत बांधकामांनी व्यापलेल्या भूभागाचे क्षेत्रफळही विस्तारणार आहे.

उपग्रहामार्फत टिपलेल्या छायाचित्रानुसार पृथ्वीच्या पाठीवरील एकंदर भूभागापैकी उणापुरा तीन टक्के भूभाग हा शहरांनी व्यापलेला आहे. म्हणजे काहीच नाही ! या जेमतेम तीन टक्के भूभागावर जगाच्या एकंदर लोकसंख्येपैकी जवळपास ५० टक्के लोकसंख्या सामावलेली आहे, ही खरी मजा. या शहरी लोकसंख्येत इथून पुढच्या काळात भर पडत जाणार आहे. या वास्तवाचा सर्वाधिक प्रभाव पडणार आहे तो शहरांतर्गत भूवापरावर. सन २००० ते २०३० या तीन दशकांदरम्यान जगातील एकूण नागरी लोकसंख्येत सुमारे ७२ टक्क्यांनी वाढ अपेक्षित आहे. मात्र, याच काळात जगभरात एक लाख वा त्यापेक्षा अधिक लोकसंख्या असलेली जी शहरे असतील त्या शहरांमधील बांधकामाखालील क्षेत्रात चांगली १७५ टक्क्यांची वाढ अपेक्षित आहे. परिणामी, शहरीकरणाच्या या दुसऱ्या लाटेदरम्यान शहरांतर्गत उपलब्ध जमिनींचा वापर हा कमालीचा जटिल, गुंतागुंतीचा आणि संवेदनशील मुद्दा बनावा.

# ANNOUNCEMENT

## INDIAN SCHOOL OF POLITICAL ECONOMY

is pleased to announce the following scheme recently introduced for subscription of the ***Journal of Indian School of Political Economy (JISPE)*** for the Block Period of Three and Five years at a substantial concession resulting in huge savings (up to 33.3%) to the new as well as existing subscribers as under, provided that the subscription amount is remitted in lumpsum on or before June 30, 2007.

| ***Subscription Category*** | ***Yearly Subscription*** | ***Three Year subscription*** | ***Five Year Subscription*** |
|---|---|---|---|
| *Universities & Institutes* | *Rs. 600/-* | *Rs. 1500* | *Rs. 2000/- Plus ** |
| ***Savings*** | ***Nil*** | ***Rs. 300/-*** | ***Rs. 1000/-*** |
| *Individuals & Colleges* | *Rs. 300/-* | *Rs. 750/-* | *Rs. 1000/-* |
| ***Savings*** | ***Nil*** | ***Rs. 150/-*** | ***Rs. 500/-*** |
| *Savings Per cent* | *Nil* | *16.2%* | *33.3%* |

* Statistical supplement to the special issue of the JISPE on 'Political Parties and Election in Indian States : 1990-2003' comprising 335 pages and costing Rs.325/- absolutely free till stocks last.

**For more details write or email to:**

The Administrative Officer,
Indian School of Political Economy,
'Arthabodh', 968/21-22, Senapati Bapat Road,
Pune 411016

Email : ispe@vsnl.net
Fax - 25657697

Phone - 25657132
- 25657210

हा प्रश्न खरोखरच बहुआयामी आहे. शहरांचे अर्थकारण, भौतिक जडणघडण, रचना, आकारमान, शहरी पर्यावरणाचे रक्षण इथपासून ते थेट सामाजिक न्याय, मानवाधिकारांपर्यंतचे पैलू त्याला जुळलेले आहेत. विशेषत:, आगामी काळातील शहरी विस्तार हा बहुश: विकसनशील देशांमध्येच घडून येणार आहे आणि त्यातही पुन्हा बहुसंख्य नव -शहरी लोकसमूह हे आर्थिकदृष्ट्या दुर्बल गटांतील असणार आहेत, ही शक्यता ध्यानात घेता तर शहरांतर्गत जमिनीचा वापर, तिचे वाटप आणि व्यवस्थापन हा अधिकच कळीचा मुद्दा ठरेल. शहरांची भविष्यकालीन वाढ, शहरांचे अर्थकारण, शहरी पर्यावरणाचे संरक्षण या सगळ्यांचा विचार या पार्श्वभूमीवर करावा लागेल.

या सगळ्याचा एक अपरिहार्य परिणाम आगामी काळातील शहरांच्या रचनेत व आकारात बदल घडून येण्यात संभवतो. शहरांच्या लोकसंख्येत भर पडली की कालांतराने शहरांना त्यांचे हातपाय हे पसरावेच लागतील. म्हणजेच, शहरांचा भौगोलिक पसारा वा विस्तार वाढू लागेल. साहजिकच, शहरांच्या परिघावर असलेले ग्रामीण जीवन शहरांच्या लपेट्यात येईल. या झालर क्षेत्रातील उपजाऊ शेतजमीन, जंगल वा वनसंपत्ती, जैव विविधता यांवर शहरीकरणाचा वरवंटा फिरणारच. शहरांच्या व त्यांच्या परिसरातील भूभागाच्या पर्यावरणाचे रक्षण करण्याचा मुद्दा इथे ऐरणीवर येणार आहे. जागतिक बँकेने अलीकडेच केलेल्या एका ताज्या अभ्यासानुसार, आगामी काळातील शहरांच्या रचनेचे व वाढविस्ताराचे 'पॅटर्न्स' हे भूवापर अधिक सघन बनविणारे असेच असतील. शहरांतर्गत जमिनींच्या आकाशाला भिडणाऱ्या किंमती, दळणवळण आणि वाहतुकीच्या साधनांमध्ये व सुविधांमध्ये सातत्याने होणाऱ्या सुधारणा यामुळे शहरांच्या भौगोलिक विस्ताराची आणि त्यापायी होणाऱ्या जमिनीच्या अधिक सघन वापराची प्रक्रिया ही उत्तरोत्तर बलवत्तरच होत जाईल, असे या अभ्यासाचे अनुमान आहे.

## 'पेरि-अर्बनायझेशन'

मुख्य शहराभोवती नवनवीन उपनगरांची निर्मिती व वाढ ही याच प्रक्रियेची निष्पत्ती. भारतासह अनेक देशांमध्ये ही प्रक्रिया गेली अनेक वर्षे सुरू आहेच. एक प्रचंड महानगर आणि अनेक लहान-लहान उपनगरांनी त्याच्या भोवती धरलेला फेर हे दृश्य आपल्याला अपरिचित मुळीच नाही. मुख्य शहरांचे आर्थिक-औद्योगिक-व्यावसायिक माहात्म्य वाढू लागले की उद्योग-व्यवसायांचे तिथे केंद्रीकरण होते. त्याबरोबर, मुख्य शहरामधील भूवापर झपाट्याने बदलतो. लोकसंख्येचे केंद्रीकरण सघन बनते. मध्यवस्तीचा भाग गजबजतो. मग शहरातील उच्चभ्रू, सधन समाजघटक शहरांच्या सीमेवरील

तुलनेने शांत व प्रशस्त प्रदेश निवासासाठी निवडतात. खासगी वाहनांची सुविधा त्यांच्यासमोर हात जोडून उभी असल्याने, निवास मुख्य शहराबाहेर मात्र व्यवसाय शहरात असे असले तरी कामाच्या ठिकाणी रोज येणेजाणे करणे, ही त्यांच्या लेखी 'समस्या' कधीच नसते. घराभोवती मुबलक मोकळी जागा, शुद्ध हवा, शहरी गजबजाटापासून सुटका, पर्यावरणाबाबतचे प्रेम, निसर्गाशी जवळीक, ग्रामीण जीवनाचे आकर्षण यांसारख्या त्यांच्या प्रेरणांची पूर्तता या स्थलांतरणामुळे साध्य होते. मुख्य शहरामध्ये मग वस्ती एकवटते ती कष्टकऱ्यांची. रोजीरोटी कमावण्यासाठी लांब अंतरावरून रोज शहरामध्ये येणे-जाणे ज्यांना आर्थिकदृष्ट्या जिकिरीचे बनते अशांची. पाश्चिमात्य राष्ट्रांमधील उपनगरी वाढीदरम्यान सर्वत्र हाच 'पॅटर्न' आजवर आढळून आलेला आहे.

विकसनशील देशांमधील 'पॅटर्न' मात्र बराच निराळा आहे. गरीब देशांमधील शहरांमध्ये उद्योग-व्यवसायांचे केंद्रीकरण सघन बनल्यानंतर साहजिकच शहरांतर्गत जमिनीचा वापर बदलू लागला. जमिनींचे भाव वाढू लागले. निम्न उत्पन्न गटातील शहरवासी समाजसमूहांना मध्यवस्तीतील घरभाडी परवडेनाशी झाली. शहराच्या सीमावर्ती प्रदेशांत गमन करण्याखेरीज त्यांना गत्यंतरच नव्हते. साहजिकच त्यांना शहराच्या मेरेवर स्थलांतरण करावे लागले. शहराच्या मध्यवस्तीत उरले ते केवळ शहरातील धनवान आणि उच्चभ्रू.

शहरीकरणाच्या या विस्तारादरम्यान शहरांच्या आकार-विस्तारात जगभरातच हे जे बदल घडून आले त्यांना मोठी साथ होती ती वाहतुकीच्या तंत्रात तसेच व्यवस्थेत घडून आलेल्या सुधारणांची. या सुधारणांपायी प्रवास एकीकडे सुलभ आणि वेगवान झाला तर दुसरीकडे तो त्या मानाने स्वस्तही बनला. विशेषतः, पाश्चिमात्य देशांमध्ये उपनगरांच्या निर्मिती व विस्ताराद्वारे एककेंद्री महानगरांच्या जागी बहुकेंद्री शहरांची व्यवस्था जन्माला आली. खासगी वाहनांच्या जोडीनेच, मुख्य शहर आणि त्याची उपनगरे यांना जोडणारी कार्यक्षम अशी सार्वजनिक वाहतूक प्रणाली व्यवहारात उतरल्याने दैनंदिन प्रवास सुकर बनला. त्यातूनच, शहर आणि त्याच्या परिसरातील भूभागाचे त्याच्या वापरानुसार विशेषीकरण झाले. परिणामी, मुख्य शहर तसेच त्याच्या परिघावरील उपनगरांना त्यांचे त्यांचे असे एक स्वायत्त, पृथक व्यक्तिमत्त्वही लाभले. या उपनगरांचे नियोजनही निगुतीने करणे शक्य झाले: पायाभूत नागरी सुविधांचा पुरवठा, त्यांची देखभाल-दुरुस्ती, त्यांचे व्यवस्थापन, त्या

व्यवस्थापनासाठी आवश्यक अशा निधीची पुरेशी तरतूद, या सुविधांचा पुरवठा व देखभाल यांची प्रशासकीय जबाबदारी स्पष्टपणे सोपविण्यात आलेली यंत्रणा अशा साऱ्या आनुषंगिक बाबींची सिद्धता परदेशांत होती.

मात्र, अलीकडील काळातील नागरी विस्ताराचा तोंडवळा हा निराळा आहे. मुख्य शहर आणि त्याच्या परिसरातील ग्रामीण विभाग यांना जोडणाऱ्या भूपट्ट्यांवर अ-सलगपणे विस्तारणारे शहरी पुंजके, अशा स्वरूपात शहरांचा भौगोलिक पसारा वाढतो आहे. हा मुख्यत्वेकरून आढळून येतो आहे तो विकसनशील देशांमध्ये. शहर विस्ताराच्या या 'पॅटर्न'ला या क्षेत्रातील अभ्यासक - तज्ज्ञांनी एक नवीनच संज्ञा तयार केली आहे -'पेरि -अर्बनायझेशन'. मुख्य शहराच्या 'पेरिफरी'वर -म्हणजे परिघावर, झालरीवर विस्तारणारे जे 'अर्बनायझेशन' ते 'पेरि -अर्बनायझेशन' अशी या संज्ञेची व्युत्पत्ती असू शकेल. म्हणजेच, आता आपण आपली परिभाषाही बदलली आहे. आपण, 'सबर्बनायझेशन'कडून 'पेरि -अर्बनायझेशन'कडे सरकतो आहोत. शहरांचा विस्तार आणि आकार बदलतो आहे. शहरांचा विस्तार आणि परिणामी त्यांचा आकार निश्चित करणारे कारक घटक बदलत आहेत. मोठ्या शहरांच्या परिघावर, मुख्य शहरांच्या झालर क्षेत्रांत अर्धनागरी विभागांची निर्मिती आणि विस्तार होतो आहे.

या बदलांचा सर्वाधिक प्रभाव झेलावा लागतो आहे तो या झालर पट्ट्यांतील लोकसमूहांना. 'प्रभाव झेलावा लागतो आहे' असे म्हणावे की 'फटका खावा लागतो आहे', असे म्हणावे हाही खरा एक प्रश्नच आहे. या बदलांमुळे मुख्य शहर आणि त्याच्या परिसरातील अ -नागरी भूभाग यांच्यातील फरक क्षीणच बनत जातो आहे. अतिशय थोडक्या काळात अंगावर कोसळणाऱ्या जोरदार बदलांसमोर हे भूभाग मोकलले जाताना दिसतात. नागरीकरणाची प्रक्रिया या पट्ट्यांत अफाट वेगाने अस्ताव्यस्तपणे घुसते आहे. परिणामी, या झालर क्षेत्रांतील पारंपरिक समाजरचना, लोकसंस्था, मूल्यप्रणाली, रोजगाराचा आकृतिबंध, भूवापर या सगळ्यांत अपूर्व बदल घडून येत आहेत. या प्रदेशांतील नैसर्गिक साधनसामग्री, पर्यावरण, शेती व शेतीसंलग्न जोडधंदे यांचा पोत विस्कटतो आहे. प्रदूषणाची कमान चढती आहे.

विकसनशील देशांमधील मुख्य शहरांच्या झालर क्षेत्रातील या जोमदार नागरीकरणाची प्रक्रिया शहरीकरणाच्या येऊ घातलेल्या दुसऱ्या लाटेदरम्यान सातत्यशील राहील, असा अभ्यासक -संशोधकांचा कयास आहे. झालर क्षेत्रांच्या या नागरीकरणास जमिनींच्या वायदेबाजारामुळे अधिकच तेजी येत आहे. मुख्य शहर आपले हातपाय

पसरू लागले की साहजिकच त्याचा हा विस्तार आज ना उद्या त्याच्या सीमावर्ती प्रदेशात पसरणार हे सूर्यप्रकाशाइतके स्पष्ट दिसू लागते. स्वाभाविकपणेच मग झालर क्षेत्रातील जमिनींना सोन्याचा भाव येतो. मुख्य शहरात विस्तारासाठी जागेची टंचाई जाणवणारे उद्योग-व्यवसाय या झालर क्षेत्रात आपले साम्राज्य स्थापण्याच्या मागे लागतात. त्यातून जमिनींचा वापर ज्याप्रमाणे बदलू लागतो त्याचप्रमाणे जमिनीच्या किंमतीही वाढू लागतात. या किंमती आवाक्याबाहेर जाण्याच्या आतच आपण जमीन खरेदी करून ठेवावी या हेतूने अनेक खरेदीदार (प्रसंगी आवश्यकतेपेक्षा किती तरी अधिक) क्षेत्र संपादन करून ठेवतात. यातून जमिनीचा व्यापार तेजीत येतो. जमिनींच्या खरेदी-विक्रीचे व्यवहार जोरात सुरू होतात.

झालर क्षेत्रांचे नागरीकरण वेगाने होण्यास खरा हातभार लावतात ते मुख्य शहरातून झालर क्षेत्रात स्थलांतरणास उत्सुक असणारे शहरातील उद्योगधंदे आणि व्यवसाय. एक तर, शहर वाढल्यामुळे या उद्योगांना त्यांच्या विस्तारासाठी शहरात पुरेशी जागाच नसते. एक वेळ जागा असली तरी शहरांतर्गत जमिनीचा शहराच्या विस्ताराबरोबरच अधिक सघन वापर सुरू झाल्याने त्या जमिनींना असणारी मागणी वाढण्यात या वास्तवाचे पर्यवसान होते. वाढत्या मागणीच्या तुलनेत शहरांतर्गत भूक्षेत्राचा पुरवठा तसा अ-लवचीक आणि म्हणूनच मर्यादित असल्याने मागणी-पुरवठ्यातील वाढत्या तफावतीबरोबर जमिनींचे भाव गगनाला चढू लागतात. साहजिकच मग विस्तारासाठी जागा शहरात उपलब्ध असली तरी तिची खरेदी आंवाक्याबाहेर जाते. अशा वेळी मग, शहरातील वर्धिष्णू उद्योग झालर क्षेत्राकडे वळतात. झालर क्षेत्रांत तुलनेने माफक व रास्त दराने उपलब्ध असणारे मुबलक भूक्षेत्र, त्याच परिसरात मिळू शकणारे मनुष्यबळ आणि किमान आवश्यक अशा नागरी पायाभूत सुविधा यांमुळे मूळ शहराच्या भौगोलिक सीमांच्या बाहेर परंतु, शहराच्या निकटच उद्योगाचा विस्तार घडवून आणणे हे केव्हाही श्रेयस्कर आणि तर्कशुद्धच ठरते. त्याच वेळी मोठे शहर नजिकच असल्याने, आपल्या उद्योगास आवश्यक व पूरक असणाऱ्या व्यवसायांच्या एकत्रीकरणाने, स्थानांकनाने ज्या 'परिव्ययऱ्हासक समूह अनुकूलता' (ॲग्लोमरेशन इकॉनॉमीज्) मूळ शहराच्या ठिकाणी काळाच्या ओघात विकसित झालेल्या असतात त्यांच्या लाभासही मुकावे लागत नाही. त्याचप्रमाणे, उद्योगाचा असा विस्तार हा शहरानजिकच घडवून आणलेला असल्याने शहरातील आपला निवास न हालवताही उद्योगव्यवसायावर देखरेख ठेवणे उद्योजकास शक्य होते.

झालर क्षेत्राच्या नागरीकरणाची प्रक्रिया जोमाने सुरू झाल्याने निवासी गाळ्यांच्या मूळ शहरांतर्गत जाणवणाऱ्या तुटवड्यावरही एक प्रकारे उतारा शोधला जातो. शहराच्या झालर क्षेत्रातील जमिनींचे भाव तसेच भाडेपट्टीचे दर हे मुख्य शहरापेक्षा बरेच माफक असल्याने निम्न वा मध्यम उत्पन्न गटातील समाजसमूहांना परवडतील अशा दराने झालर क्षेत्रात निवासी गाळे उपलब्ध होऊ शकतात. निदान अनेकदा तशा शक्यता तरी रुंदावतात. त्यामुळे, मुख्य शहराच्या भरवस्तीमधून झालर क्षेत्राकडे स्थलांतरण करणाऱ्यांना निवासी जागेचा प्रश्न भेडसावत नाही. त्याच वेळी, जागतिकीकरणाच्या प्रक्रियेद्वारे शहरांच्या वैश्विक साखळीत वेगाने गुंफल्या जात असलेल्या अशा मोठ्या आणि विस्तारणाऱ्या महानगरांच्या झालर क्षेत्रांकडे स्थलांतरितही मोठ्या संख्येने आकर्षित होतात ते तिथे वाजवी दरात उपलब्ध असलेल्या निवासी गाळ्यांमुळेच. परिणामी, विकसनशील देशांमधील अनेक महानगरांच्या झालर क्षेत्रातील अर्धनागरी भूप्रदेश वा भूपट्टे आजमितीस स्थलांतरितांची आगरे बनल्याचे अनुभवास येते.

या सगळ्या घडामोडींपायी विस्तारक्षम शहरांच्या ग्रामीण परिसरांचा पूर्वापार असणारा खेडवळ तोंडवळा पार लोपून जातो. या प्रदेशांत बिगर कृषी उद्योग-व्यवसायांचे आधिक्य आणि प्राबल्य वाढते. रोजगाराच्या नवनवीन संधी उपलब्ध होतात. परिणामी, परिसरातील ग्रामवासियांना रोजगाराच्या शोधार्थ शहराकडे धाव घ्यावी लागत नाही. या सगळ्याद्वारे या झालर क्षेत्रांची पूर्वापार कृषिप्रधान असणारी अर्थव्यवस्था संमिश्र स्वरूपाची बनते. मात्र, या घडामोडींचा एक अपरिहार्य परिणाम म्हणजे या अर्धनागरी प्रदेशास बेफाम, अस्ताव्यस्त नागरी वाढीचा सामना करावा लागतो. निरनिराळ्या स्तरांवरील प्रशासनासमोर मग आव्हान उभे ठाकते ते या साऱ्या भूपट्ट्यात नागरी सुविधा पुरविण्याचे...... या नव -नागर भूप्रदेशाची भविष्यकालीन वाढ नियोजनबद्ध प्रकारे घडून यावी यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करण्याचे...!

## एक विनंती...

वाचकांचा प्रतिसाद हा कोणत्याही लेखन-संपादन व्यवहारातील जितका आनंदाचा तितकाच प्रबोधक भाग असतो. 'अर्थबोधपत्रिके'च्या अंतरंगासंदर्भात समाधान व्यक्त करणारी वाचकांची पत्रे ही उत्साह वाढविणारी अशीच असतात. परंतु त्याच्याच जोडीने, पत्रिकेकडून असणाऱ्या अपेक्षाही शब्दबद्ध करून पत्ररूपाने मांडल्यास अधिक संतोष होईल.

-संपादक

(पृष्ठ ३ वरून)
परंपरा, भाषा, विचारप्रणाली, मूल्यरचना या मानवी जीवनाच्या विविध अंगांना आपल्या उदरात सामावून घेणाऱ्या 'संस्कृती'नामक एका विशाल आणि तितक्याच गुंतागुंतीच्या व्यवस्थेमध्ये आमूलाग्र स्थित्यंतर घडून येणे. या परिवर्तनाला सामोरे जाण्यास आपण सारेच सिद्ध आहोत का ? आपल्या एकंदर विचारसरणीतच आपल्याला बदल करावा लागणार आहे. विशेषतः आर्थिक विकासाच्या सर्वसाधारण धोरण आखणी-अंमलबजावणीत तर या रूपपालटाची संवेदनशीलतेने दखल घ्यावी लागेल. आजवर, विकासासंदर्भातील सारी विचारसरणी ही 'ग्रामीण विकास' या केंद्रबिंदूभोवती फिरणारी होती. आता त्याच्याच जोडीने नियोजनबद्ध शहर विकासाचे आव्हानही पेलावे लागणार आहे. या स्थित्यंतरातून ज्या प्रमाणे नवनवीन आव्हाने उभी ठाकतील त्याचप्रमाणे अकल्पित अशा संधींची कवाडेही उघडली जातील. उंबरठ्यापाशी येऊन ठेपलेल्या या 'नागरी' जगाच्या काही पैलूंचा वेध घेण्याचा प्रयत्न 'अर्थबोधपत्रिके'च्या या अंकात केला आहे. हा सारा अंकच त्या मंथनासाठी वाहिलेला आहे. ✿✿

---

(पृष्ठ ४ वरून)
नाही. याची सुरुवात, खरे म्हणजे, चिनी बनावटीच्या वस्तू भारतीय बाजारपेठांत उपलब्ध होण्यापासून झाली. हळूहळू चिनी चीजांनी येथील बाजारपेठेत आपले बस्तान बसविले. विविध खेळणी, विद्युत उपकरणे व साहित्य, स्टेशनरी, खाद्यपदार्थ ही याची काही उदाहरणे. तथापि, आज आकर्षक वाटणाऱ्या 'सेझ' नामक संकल्पनेचे भविष्यात उद्भवू शकणारे काही संभाव्य दुष्परिणाम इथे नोंदवावेसे वाटतात - (१) शहरीकरणाच्या प्रमाणात (अस्ताव्यस्त ?) वाढ संभवते (२) गरीब आणि श्रीमंत यांच्यातील आजच बोचरी असणारी विषमतेची दरी अधिकच रुंदावेल (३) वेगळ्या स्वरूपात का होईना, पण, जमीनदारी पद्धत सुरू होण्याची शक्यता (४) 'कसेल त्याची जमीन' न राहता 'खरेदी करील त्याची जमीन' असे नवीनच समीकरण त्यामुळे व्यवहारात रूढावेल (५) बेरोजगारीमुळे चोऱ्या, दरोडे आणि एकंदरच गुन्हेगारी प्रवृत्तींच्या प्रमाणात वाढ संभवते. आजच हे वास्तव अनुभवास येत आहे. 'सेझ'चे पुरस्कर्ते या शक्यतांची दखल घेतील का ?

**बाळासाहेब कुळकर्णी, अहमदनगर**

# प्रमुख संदर्भ

(1) State of World Population 2007 : Unleashing the Potential of Urban Growth, United Nations Population Fund, June 2007.

(2) Oxford Handbook of Urbanization in India : An Analysis of Trends and Processes, Sivaramakrishnan, K.C.; Kundu, Amitabh; Singh, B.N., Oxford University Press, New Delhi, 2005.

(3) Urban Growth in India 1951-81 (A Statistical Analysis) Census Monograph No. 1, Census of India 1981, Office of the Registrar General, India, Ministry of Home Affairs, New Delhi, 1984.

(4) Schreiber, A.F.; Ceatons P.K. and Clemmer, R.B., Houghton Muffin Company, Boston, 1971.

(5) The Process of Urbanization : Hope Tisdale Eldridge : published in 'Demographic Analysis : Selected Readings' : Spengler, J.J.; Duncan, O.D. (ed.); The Free Press, Glencoe, Illinois, 1956.

## भेट अंक योजना

'अर्थबोधपत्रिका' या उपक्रमात सहभागी झाल्याबद्दल आपले आभार. यात आपल्यासारख्या अनेकांचा सहभाग वाढावा, यासाठी आम्ही आपल्याकडून एक छोटी मदत मागत आहोत. 'अर्थबोधपत्रिका' आपल्यासारख्याच आणखी काही उत्सुक व्यक्तींपर्यंत पोचण्यासाठी आपणास विनंती अशी की, आपण आपल्या परिचयातील वाचनोत्सुक अशा व्यक्तींची नावे व पत्ते आम्हाला लेखी कळवावीत. म्हणजे आम्ही त्यांना एक 'भेट अंक' पाठवू. अंक आवडल्यास त्यांना 'पत्रिके'चे वाचक बनण्याबरोबरच संस्थेच्या समृद्ध ग्रंथालयाचाही लाभ घेता येईल.

### 'अर्थबोधपत्रिके'च्या सदस्यांसाठी वाचनसंधी

भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी या संस्थेच्या संदर्भ ग्रंथालयात सामाजिक, आर्थिक, राजकीय व अन्य विषयांवरील सुमारे बारा हजारांवर उत्तमोत्तम ग्रंथ आहेत. केवळ इतकेच नाही तर, इकॉनॉमिस्ट, डाउन टू अर्थ, करंट सायन्स, इकॉनॉमिक ॲन्ड पोलिटिकल वीकली यांसारख्या विख्यात नियतकालिकांचे गेल्या अनेक वर्षांचे अंकही संग्रहात आहेत. 'अर्थबोधपत्रिके'च्या सदस्यांना या संदर्भ ग्रंथालयाचा लाभ विनामूल्य घेता येईल. या वाचनसंधीबाबत अधिक तपशीलासाठी व्यवस्थापकांकडे चौकशी करावी.

## भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीचे नवे प्रकाशन

आपल्या दैनंदिन जीवनावर प्रभाव पाडणाऱ्या क्रांतिकारी मेंदूसंशोधनावरील आकर्षक, सचित्र व संग्राह्य ग्रंथ

# कर्ता-करविता

### आधुनिक मेंदूसंशोधन व आपले जीवन

**मराठी भाषेला अभिमान वाटावा असे पुस्तक - डॉ. ह. वि. सरदेसाई**

● मेंदूसंशोधन ही एक क्रांतीच! मानवी जीवनाला अधिक उच्च टप्प्यावर नेणारी ऐतिहासिक घटना! या क्रांतीचा आलेख रेखाटणारा ग्रंथ.

पृष्ठे २४२ किंमत ३५०/-रुपये

**ग्रंथ घेणाऱ्यांना अर्थबोधपत्रिका मासिक एक वर्ष विनामूल्य**

## अर्थबोधपत्रिका वर्गणीदारांसाठी विशेष योजना

**(१ जून २००६ पासून)**

| | |
|---|---|
| वार्षिक वर्गणी | फक्त १०० / - रुपये |
| द्वैवार्षिक वर्गणी | फक्त १८० / - रुपये व 'अर्थबोधपत्रिके'चा मेंदूसंशोधन विशेषांक भेट |
| त्रैवार्षिक वर्गणी | फक्त २६० / - रुपये व एक पुस्तिका भेट |
| पंचवार्षिक वर्गणी | फक्त ४०० /- रुपये व दोन पुस्तिका भेट |

**पुस्तिका -** (१) भारतातील लोकसंख्यावाढीचा प्रश्न : लेखिका - कुमुदिनी दांडेकर (किंमत ३०/-रुपये) (२) सक्तीचे प्राथमिक शिक्षण : (इंग्रजी व मराठी) लेखक - जयकुमार अनगोळ (दोन्हीची किंमत ३०/-रुपये प्रत्येकी) (४) शोध घेते ते शिक्षण : लेखक - प्रा. रमेश पानसे (किंमत -५०/-रुपये) (५) मेंदूसंशोधन विशेषांक ( किंमत ४०/-रुपये)

# ग्रंथालयातील नवी पुस्तके

**Cluster Genesis : Technology-Based Industrial Development**

Pontus Braunerhjelm and Maryann Feldman (Ed.), Oxford University Press, New York, 2006, Price - 55 pounds.

औद्योगिक क्रांतीनंतर देशादेशांमधील अर्थकारणाला वेग आला, शहरीकरणही वाढू लागले. विसाव्या शतकात विज्ञान-तंत्रज्ञान ज़सजसे विकसित होऊ लागले तसतशी ही प्रक्रिया अधिकच गतिमान झाली. या प्रक्रियेतच अर्थव्यवस्थेला चालना देणारे काही विशिष्ट उद्योग विशिष्ट शहरांत, प्रांतात स्थापन होऊ लागले, विस्तारू लागले. हळूहळू त्यांची इतकी भरभराट झाली की ती शहरे वा ते प्रांत त्या विशिष्ट उद्योगांमुळे ओळखले जाऊ लागले. उद्योगांचे हे 'क्लस्टर' वेगवेगळ्या देशांत वेगवेगळ्या शहरांमध्ये आकाराला आले. या घडामोडींचा परिणाम देशोदेशींच्या धोरणांवर, अर्थकारणावर होणे स्वाभाविकच म्हटले पाहिजे. चित्रपटांसाठी सुप्रसिद्ध झालेले हॉलिवूड, कम्प्युटरसाठी सिलिकॉन व्हॅली आणि बायोटेक्नॉलॉजीसाठी बॉस्टन आणि सॅनफ्रान्सिस्को ही याची अमेरिकेतील काही उदाहरणे. तर, भारतात चित्रपटांसाठी प्रसिद्ध झालेले मुंबई (बॉलिवूड), 'आय.टी.'साठी बेंगळूर व पुणे यांचा उल्लेख या संदर्भातील उदाहरणे म्हणून करता येईल. चीनमध्येही बीजिंग, शांघाय, ग्वांडोंग या शहरांबाबत असे घडते आहे. हे असे 'क्लस्टर' विशिष्ट शहरांतच का निर्माण होतात, तंत्रज्ञानाधारित औद्योगिक विकास विशिष्ट शहरांभोवती का विस्तारतो, या मूलभूत प्रश्नाचा शोध 'क्लस्टर जेनेसिस' या पुस्तकात घेण्यात आला आहे. अमेरिका व चीन या देशांप्रमाणेच स्कॅन्डेनेविया येथील मेडिकॉन व्हॅली, आयर्लन्ड येथील आय.टी उद्योग आणि इस्रायलमधील व्हेंचर कॅपिटल उद्योगाचा विचार या पुस्तकात करण्यात आला असला तरी भारतातील शहरांचा अभ्यास यात नाही. पण तरी तीन भागांत विभागलेल्या या पुस्तकातील मूळ विषय समजावून घेण्यात अडचण येत नाही. औद्योगिक 'क्लस्टर्स'ची उत्पत्ती या प्रास्तविकानंतर पहिल्या भागात अमेरिकेतील तीन 'क्लस्टर्स'ची ओळखं करून देण्यात आली आहे. दुसऱ्या भागात इतर देशांमधील 'क्लस्टर्स'चा उगम व तिसऱ्या भागात धोरणांवर होणाऱ्या परिणामांबाबत ऊहापोह करण्यात आला आहे. तंत्रज्ञानविषयक औद्योगिक घडामोडी भविष्यकाळात वाढणार असल्याने सामाजिक शास्त्रांच्या अभ्यासकांना हा ग्रंथ अतिशय उपयुक्त आहे. ■■

RNI, Regn.No. MAHMAR/2002/9806
Declaration Ref. P.H.M./S.R./180/VIII/2005
Postal Regn.No.: L-2/RNP/PNW/M 125/2007-2009
LICENCE NO. LWP-228
Posted at Market Yard P.S.O. on 10th of each month

# भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी

**स्थापना** ■'इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी' ही संस्था प्रसिध्द अर्थतज्ज्ञ वि. म. दांडेकर यांनी १९७० साली स्थापन केली.

**उद्दिष्टे** ■भारताच्या सामाजिक, राजकीय, व आर्थिक समस्यांचा अभ्यास व संशोधन करणे. ■अभ्यासक, संशोधक, सामाजिक व राजकीय कार्यकर्ते, शासनकर्ते, उद्योजक, उद्योग - व्यवसायातील वरिष्ठ अधिकारी व सामान्य जनता यांना वरील विषयांचे ज्ञान व माहिती देणे. ■इंग्रजी व इतर भारतीय भाषांमध्ये संदर्भित विषयांवरील साहित्य/पत्रके/ पुस्तिका योग्य नमुन्यात प्रकाशित करणे.

**उपक्रम** ■संस्थेतर्फे १९८९ सालापासून, भारताच्या आर्थिक, सामाजिक, राजकीय विचारांना वाहिलेले एक इंग्रजी त्रैमासिक('जर्नल ऑफ इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी') चालवले जाते. ■संस्थेतर्फे वेळोवेळी, विविध विषयांवर अभ्यासशिबिरे, कार्यशाळा, चर्चासत्रे, गटचर्चा यांसारखे कार्यक्रम आयोजित केले जातात. ■अलीकडे, संस्थेतर्फे सर्वसामान्य माहिती विभिन्न वाचकांना देणाऱ्या, वेगवेगळ्या विषयांवरील छोट्या पुस्तिका तयार करून वितरित करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे.

## - संस्थेचे नियंत्रण मंडळ -

●अजित कर्णिक ●विकास चित्रे ●कुमुदिनी दांडेकर
●ललित देशपांडे ●द.ना. धनागरे ●आनंद नाडकर्णी ●सुहास पळशीकर
●रमेश पानसे ●मनोहर भिडे ●योगेंद्र यादव ●नीळकंठ रथ
●व्ही.एम्.राव ●ए.वैद्यनाथन ●रामदास होनावर

**इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी (भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी) पुणे या संस्थेच्या मालकीचे हे मासिक, मुद्रक व प्रकाशक रामदास होनावर यांनी एस. के. प्रिंटर्स, परज अपार्टमेंट, २०५ शनिवार पेठ, पुणे - ४११०३० येथे छापून 'अर्थबोध', ९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग, पुणे - ४११०१६ येथून प्रकाशित केले. संपादक : अभय टिळक**